
स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती
विशेषांक!!

मासिकांक १४

दिनांक: ३० जून २०२२

# "ती"चं पान

## तिच्याकडून सगळ्यांसाठी



संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

www.tichapaan.com

tichapaan@gmail.com

Facebook Page

७३७८४९९९७७

***टीप:*** या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखनातील मतांशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

# अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| १. प्रस्तावना | ५ |
| २. दोन शब्द | ६ |
| ३. सावरकर, काल आणि आज! | ९ |
| ४. पत्रास कारण की... | १३ |
| ५. स्वातंत्र्यवीर सावरकर आणि अंधश्रध्दा निर्मूलन | १५ |
| ६. दोन शब्द सावरकरांसाठी | १८ |
| ७. काव्य आणि क्रांतीचा संगम | २० |
| ८. बहुआयामी सावरकर | २४ |
| ९. काळे पाणी | २७ |
| १०. स्वर्गातील सावरकर | ३१ |
| ११. रंगुनी रंगात साऱ्या | ३४ |
| १२. सावरकर एक धगधगते अग्निकुंड! | ३८ |
| १३. शूरा मी वंदिले | ४० |
| १४. सावरकरांचे अंदमानपर्व | ४३ |
| १५. तात्याराव: एक प्रेरणादायी विचार | ५० |

# श्रेय नामावली

| | |
|---|---|
| प्रबंध संचालिका व संपादक | सौ. सायली अक्षय देशपांडे |
| अतिथी संपादक व मार्गदर्शिका | सौ. शुभा साठे |
| मुखपृष्ठ, अंक मांडणी व सजावट | अक्षय देशपांडे |
| टीम “ती”चं पान | |
| | तृष्णा आंबेकर |
| | अपूर्वा भालेराव |
| | रेणुका देशपांडे |
| | दिशा टिकेकर |
| | मृण्मयी सारंग |
| | भार्गवी बाबरेकर |
| | निर्मिती देवलसी |
| | संजीवनी मराठे |
| | स्वर्णिमा प्रकाश |
| | प्राजक्ता बर्वे |

# प्रस्तावना

सायली अक्षय देशपांडे

रसिकहो नमस्कार! "ती" चं पान चा "सावरकर जयंती विशेषांक" प्रकाशित करतांना अत्यंत आनंद होतो आहे. भारताच्या स्वातंत्र्य समरात ज्या ज्या क्रांतिवीरांची नावं घेतली जातात त्यात अग्रगणी असलेलं नाव म्हणजे विनायक दामोदर सावरकर अर्थातच स्वातंत्र्यवीर सावरकर. "ती"चं पान हे कायमच वेगवेगळ्या विषयांना घेऊन रसिक वाचकांच्या पसंतीस उतरले आहे. दर महिन्यात विविध विषयांवर लिहित असतांना जून महिन्याचा अंक हा काहीतरी वेगळा आणि नाविन्यपूर्ण असावा या एकमात्र उद्देशाने यंदाचा मासिकांक हा वि.दा. सावरकर यांना समर्पित आहे.

सद्यपरिस्थितीत सावरकर हे नाव वादग्रस्त ठरत असतांना याच समाजात बरीच माणसं अशी आहेत ज्यांना खरोखरच या नावाबद्दल प्रेम आहे त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता आहे अशा उत्तम आणि छान विचारांची बैठक असलेल्या अनेक सावरकर प्रेमी मैत्रिणींचे यात लेख आम्हाला समाविष्ट करता आले याचा विशेष आनंद! या माध्यमातून बरेच नवीन लिहिते हात आम्हाला मिळाले आणि ते अगदी उत्तमरित्या यात लेखन स्वरूपात व्यक्त झाला याचा आनंद शब्दातीत आहे.

या मासिकांकाचं खरं भाग्य म्हणजे यात "दोन शब्द"या मथळ्याखाली स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांवर अभ्यास असलेले आणि खरे सावरकर प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवणारे श्री. अक्षय जोग यांचे लेखन लाभले हा खरोखरच दुग्धशर्करा योगच म्हणायला हवा. त्यामुळे या अंकाला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त झाले असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही.

या अंकापासून अनेक क्षेत्रात कार्यरत असलेल्या "ती" चे लिहिते हात मिळाले. या अंकाचे मुखपृष्ठ आणि संपूर्ण अंक सुशोभित करणारे श्री. अक्षय देशपांडे यांचे सुद्धा विशेष कौतुक. या प्रस्तावनेत जास्त काही न बोलता हा अंक जास्त बोलका ठरेल अशी आशा करते आणि माझ्या लेखणीला विराम देते.

***धन्यवाद !***

# दोन शब्द

श्री. अक्षय जोग

## समाजक्रांतिकारक सावरकर
### सात स्वदेशी श्रृंखला- सप्तबेड्या

ब्रिटिशांची परदेशी श्रृंखला झुगारून देण्यासाठी झटणारे क्रांतिकारक सावरकर त्याच त्वेषाने वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धीबंदी, रोटीबंदी व बेटीबंदी ह्या सात स्वदेशी श्रृंखला तोडण्यासाठीही अविरत झटताना दिसतात.

***वेदोक्तबंदी***- सर्व हिंदूंना वेदादीक धर्मग्रंथावर समान हक्क असावा.

***व्यवसायबंदी***- ज्या व्यक्तीस जो व्यवसाय करायची इच्छा व धमक असेल, त्या व्यक्तीस तो व्यवसाय करण्याची अनुमती असावी. अमक्या जातीत जन्मला म्हणून तमका व्यवसायच करावा, इतर व्यवसाय करू नये ही जबरदस्ती असता कामा नये.

***स्पर्शबंदी***- 'अस्पृश्यता ही तर निव्वळ मानीव, पोथीजात माणुसकीचा कलंक, ती तर तात्काळ नष्ट झाली पाहिजे.' असे सावरकर स्पष्टपणे म्हणतात.

***सिंधुबंदी***- परदेशगमन जातीबहिष्कार्य पाप ठरवू नये.

***शुद्धीबंदी***- पूर्वी परधर्मात गेलेल्या किंवा जन्मत: परधर्मीय असलेल्या अहिंदूंना हिंदूधर्म स्वीकारायचा असल्यास तशी सोय उपलब्ध असावी. सावरकरांनी रत्नागिरीत शुद्धीकार्यही केले होते.

***रोटीबंदी***- 'खाण्याने जात जाते, धर्म बुडतो' ह्या खुळचट कल्पना आहेत म्हणणारे सावरकर 'धर्माचे स्थान हृदय आहे, पोट नव्हे' असे सांगतात. रोटीबंदी तोडण्यासाठी सावरकरांनी रत्नागिरीत मोठ्या प्रमाणात सहभोजने घडवून आणली.

***बेटीबंदी***- विवाहासाठी जात हा निकष असू नये. गुण, शील, प्रीती, आरोग्य या गोष्टी अनुरूप आहेत का हे पाहावे.

## पतितपावन मंदीर

सावरकर हे कृतीशील विचारवंत होते. त्यामुळे ते केवळ लेखणीद्वारे विचार मांडून थांबले नाहीत, तर प्रत्यक्ष कृतीद्वारे अस्पृश्यता निर्मूलनाचा वस्तुपाठ त्यांनी घालून दिला.

पूर्वास्पृश्यांचे मंदिरप्रवेश आंदोलन हाती घेताना घाई न करता सर्वप्रथम 'दर्शनाने बाटतो तो देव कसला' ही भावना जनमानसात दृढ व्हावी म्हणून प्रयत्न केले. एप्रिल १९२५ मध्ये शिरगावच्या गुरव समाजातील एका स्वतंत्र मंदिरात हनुमानाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी सावरकर गेले असता त्यांनी गुरव बांधवांना अस्पृश्यता निवारणाचे महत्त्व व आवश्यकता पटवून देऊन भजनात पूर्वास्पृश्य बांधवांनाही एकत्र बसवून घेण्याचे मान्य करून घेतले. याप्रसंगी भाषण करताना सावरकर म्हणाले, "अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या हिंदूंस देवाची पूजा करण्याचा इतर हिंदूंप्रमाणेच निसर्गसिद्ध अधिकार आहे. तो त्यास उपभोगू देणे हा खरा धर्म.... देवाच्या पायावर वाटेल त्या हिंदूंस जेव्हा आपले डोके टेकण्याचा अधिकार मिळेल तेव्हांच त्याला आपल्या धर्माविषयी, समाजाविषयी खरे ममत्व वाटू लागेल."

यानंतर १९२७ साली रत्नागिरीतील विठ्ठल मंदिरात मिश्रहिंदूमेळा घेऊन सावरकरांनी मंदिर प्रवेशाच्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकले. नंतर विठ्ठल मंदिराचा गाभाराच पूर्वास्पृश्यांस मुक्त करून देण्यासाठी चर्चा करण्यासाठी दि. २९ नोव्हेंबर १९२९ ला एक सभा आयोजित केली होती. त्या सभेत आपल्या कोटीक्रमाने आपले म्हणणे सावरकरांनी पटवून देऊन विजय मिळवला आणि कार्तिकी एकादशीला पूर्वास्पृश्यांसाठी श्रीविठ्ठल मंदिर खुले झाले.

भागोजी शेट कीरांच्या आर्थिक सहकार्याने आणि सावरकरांच्या पुढाकाराने पतितपावन मंदिराच्या पायाची कोनशिला १० मार्च १९२९ रोजी शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या उपस्थितीत बसविली गेली. याप्रसंगी सावरकर म्हणाले, "वास्तविक काशी विश्वेश्वर, जगन्नाथपुरी, द्वारका, रामेश्वर आदी सर्व मंदिरे सर्व हिंदूंना ठराविक नियमांनी दर्शनासाठी मुक्त असली पाहिजेत. जन्मजात जातीभेदामुळे कोणाही हिंदूला मंदिरात प्रवेश करण्यास प्रतिबंध असू नये. पण हे तत्त्व जोवर समाजाला मान्य होत नाही तोवर तरी निदान सर्व हिंदूंना मुक्तद्वार असलेले एक मंदिर बांधावे अशी कल्पना माझ्या मनात होती."

१९३१ ला सर्व हिंदूंना खुले व ज्याच्या न्यासावर पूर्वास्पृश्यांसह सर्व जातींचे पुढारी असतील असे 'पतितपावन मंदिर' स्थापन झाले. 'जुन्या देवळाचा प्रश्न नव्या देवळातील सांघिक पूजेच्या सवयीने अधिक लवकर सुटेल' हे जाणूनच पतितपावन मंदिर बांधण्यात आले होते.

आपले सामाजिक विचार मांडण्यासाठी सावरकरांनी 'संगीत उ:शाप' हे नाटक, 'जात्युच्छेदक निबंध', 'क्ष' किरणे, 'विज्ञाननिष्ठ निबंध' ह्यासारखे ग्रंथ तसेच कविता, कथा असे विविध वाङ्मयीन प्रकार हाताळले. सावरकर एक कृतिशील विचारवंत होते त्यामुळे सावरकर नुसते विचार मांडून थांबले नाहीत. सहभोजन, मंदिरप्रवेश, पूर्वास्पृश्यांसह सर्व जातीच्या मुलांना शाळेतून एकत्र बसवणे, पूर्वास्पृश्यांसह सर्व जातीच्या लोकांसह घरोघरी दसरा व संक्रांतीला सोने व तिळगूळ वाटप, बँकेकडून कर्ज घेऊन उभारलेला पूर्वास्पृश्यांचा बँड, १९२९ पासून सुरु केलेल्या अखिल हिंदू गणेशोत्सवातील भंगीबुवांचे कीर्तन, हरिजन भजन मंडळ, महिलांची प्रकट भाषणे असे अनेक समाजसुधारणेचे उपक्रम सावरकरांनी यशस्वी केले.

# सावरकर, काल आणि आज!

डॉ. मानसी मोहरील

आजही तो दिवस आठवतो, ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला गाणं ऐकलं. गाणं कसलं? एका मुलाची आईकरता असलेली ओढच ती! एक एक शब्द ऐकतांना स्फुरण चढत होतं. त्याच काळात कधीतरी मी कविता लिहायला आणि माझं लिखाण गांभीर्याने घ्यायला सुरुवात केली होती. त्यामुळेच कदाचित शब्दांकडे माझं जास्त लक्ष होतं. एवढ्या लहान वयातही मनाला भिडलेला एक एक शब्द! कुणी लिहिलेत हे शब्द? विनायक दामोदर सावरकरांनी!

बालपण निरागस असतं, मऊ मातीच्या गोळ्याला आकार देऊन हळूहळू त्याला संस्कारांची, परंपरेची उब देऊन तो आकार पक्का केला जातो. आपल्या इतिहासातील वीरगाथा त्या बालपणी उरात एक आग निर्माण करतात. मातृभूमी प्रति प्रेम जागृत करतात. आपल्या मायभूमीला लाभलेल्या वीरांचे शौर्य, त्यांचे विचार त्या नाजूक वयात मनावर योग्य ते संस्कार तर करतातच, पण त्यांची जीवनमूल्ये, जी आपल्याही आयुष्यात आपण जपायला हवीत, ह्याच वयात मनात पक्की होतात. तसेच काहीसे आमचेही बालपण होते म्हणायला हरकत नाही. अभ्यासक्रमात असलेल्या कविता, धडे ह्या माध्यमांतून; क्रांतिकारकांचे, थोर विचारवंताचे, लेखकांचे विचार सतत कानावर पडायचेत. आजी आजोबांकडून गोष्टी ऐकायला मिळायच्यात. घरात मोठ्यांकडून सुद्धा स्वातंत्र्यपूर्व काळाबद्दल सतत काही तरी कानी पडायचंच . समाज माध्यमातून, वृत्तपत्रांतून अनेक सकारात्मक गोष्टी वाचनात यायच्या. त्यामुळेच कदाचित आमची नाळ मातीशी घट्ट जोडल्या गेली. आज सुद्धा, ती नावं ऐकलीत, की एक प्रकारचा आदर मनात आपोआपच निर्माण होतो. त्याच क्रांतिकारकांमध्ये, लेखकांमध्ये, विचारवंतांमध्ये एक नाव आहे, वि.दा. सावरकर.

क्रांती घडवायची म्हटलं की हातात हत्यार घ्यावं लागतंच. सावरकरांनी त्यांच्या विचारांनी, त्यांच्या लेखणीने हे काम केले. सुशिक्षित आणि सुजाण समाजाशिवाय स्वातंत्र्य प्राप्ती होऊच शकत नाही, ह्या विचारावर ते ठाम होते.

आणि ह्याच विचारांकरता त्यांनी जीवाचं रान केलं. सगळ्यांना समान अधिकार मिळावेत म्हणून झगडणारे सावरकर; जातीय भेद, अस्पृश्यता ह्या सगळ्यांनी जखडलेल्या समाजाला मुक्त करणं हा एकच ध्यास असलेले सावरकर; निडर होऊन, समोर आलेलं प्रत्येक संकट अंगावर झेलणारे सावरकर, आपल्या विचारांना बेधडकपणे जगासमोर मांडणारे सावरकर, आजही मनात त्यांची तीच छवी आहे! त्यांच्या विचारात एक पारदर्शकता होती. आजकाल लोकांना जे हवंच असतं, असं लॉजिक' सुद्धा होतं. आणि म्हणूनच त्यांच्या ह्या तर्कशुद्ध विचारांना आपल्या जीवनाचा भाग बनवणं किती आवश्यक आहे, हे अगदी लहानपणीच आमच्या आणि आमच्या आधीच्या अनेक पिढ्यांच्या मनात रुजवलं गेलं, नव्हे, तर ते आपोआपच रुजत गेलं.

आज आपल्याकडे असंख्य साधनं आहेत, ज्यामुळे आपलं जीवन आपण सुकर बनवू शकतो, परंतु स्वातंत्र्यवीरांनी ज्या परिस्थितीत मानवतेची ही चळवळ हाती घेतली आणि ज्या पद्धतीने समाजाकरता, देशाकरता आपलं आयुष्य वाहिलं ह्याचा जरा जरी विचार आपण केला, तरी त्यांच्याप्रती असणारा आदर दसपटीने वाढेल. असंच काहीसं माझं झालं जेंव्हा २०१४ साली मार्सेला जाण्याचा योग आला. खरंतर त्यावेळी मी एका वेगळ्याच उत्साहाने भारावले होते. ती माझी पहिली आंतरराष्ट्रीय परिषद होती. मी दक्षिण फ्रान्स च्या एका शहरात जाणार होते. युरोपात आल्यापासून एकटीने पहिल्यांदाच प्रवास करणार होते. मार्से विमातळावर उतरल्यावर सहज एका दिशादर्शकावर 'समुद्राकडे जाण्याचा मार्ग ' असं पाहिलं आणि क्षणभर मी स्तब्ध झाले. हाच तो समुद्र! इथेच तर सावरकरांनी ती ऐतिहासिक उडी मारली होती. तो समुद्र, खारा समुद्र, गार पाणी, किती बोचलं असेल त्यांना, किती त्रास झाला असेल! पण असा म्हणतात ना, आपलं ध्येय पक्कं असलं की शरीराला झालेल्या वेदना जाणवत नाहीत. त्यांच्या मुत्सदी पणाचा परिणाम होती ही उडी. तो किनारा बघितल्यावर, इथे सावरकरांचे पाय कधीतरी लागले असतील या विचाराने, हात आपोआप जोडले गेलेत.

त्यांच्या ह्याच धोरणी स्वभावाचं आणखी एक मनात घर करून बसलेलं उदाहरण म्हणजे त्यांच्या तुरुंगवासातील जीवन. सावरकरांना जेव्हा तुरुंगात कागद आणि लेखणी नाकारली तेंव्हा त्यांनी भिंतीवर कविता लिहायला सुरुवात केली. जागा संपली की भिंती पुसायच्या आणि मग पुन्हा नवीन कविता! ह्या सगळ्या कविता त्यांना , सोप्या भाषेत सांगायचं तर पाठ होत्या! हे साधारण मनुष्याचं काम नव्हेच.

ती दैवी शक्तीच आहे. हीच मूल्ये, हेच गुण जर आपल्याला, अगदी काही प्रमाणात जरी आपल्या आयुष्यात आणता आलेत, तरी आयुष्य सार्थकी लागेल. सावरकरांचे जीवन ही एक साधना आहे!

पण कधी कधी हा प्रश्न उभा राहतो, की हेच सावरकर; जे माझ्या पुढ्यात, माझ्या बालपणी उभे राहिलेत; तेच माझ्या वयाच्या अनेकांच्या समोर उभे असतील, ह्यांच्याच समोर तर नतमस्तक होत होतो आम्ही, शाळेच्या प्रांगणात, तालासुरात जयोस्तुते गात होतो आम्ही! मग आज का ते सूर हरवून, एक नकारात्मक, विखारी आणि अतिशय वेदनादायी असा स्वर कानी पडतोय. पूर्वी जे सावरकर आमचे देव होते, ते आज का राजकारणाचा एक मुद्दा झालेत? अतिशय वेदनादायी आहे हे.

ज्या सावरकरांनी अतिशय सुंदर भाषेत अनेक कविता लिहिल्यात, आज त्याच सावरकरांना अनेक साहित्यिक फक्त आणि फक्त त्यांच्या विचारांसाठी नाकारत आहेत? अनेक राजकारणी, ज्यांना साधी उन्हाची झळ सुद्धा सहन होत नाही, सावरकरांबद्दल खालच्या पातळीला जाऊन बोलतात? का आणि कशासाठी आपल्या इतिहासातील ह्या तेजस्वी क्रांतिकारकाच्या प्रतिमेला मलिन करण्याचा अट्टहास सुरु आहे?

सध्याचे जग हे समाज माध्यमांचे आहे! लोकांना अगदी स्वतःची कामं करता येत नसली तरी फेसबुक, व्हाट्सअँप वापरताच येतं. मग ह्या माध्यमांतून आपल्या मातृभूमीचा खरा इतिहास जगासमोर का मांडल्या जात नाही? आजकालचे 'मिलेनिअल्स" वेगवेगळ्या विषयांवर भाष्य करतांना दिसतात, पण त्यांना जर भारताच्या इतिहासाबद्दल विचारलं तर मात्र त्यांना काहीही ठाऊक नसतं. आणि समाज माध्यमांवरील चुकीच्या भाषा आणि चुकीच्या माहितीमुळे त्यांची दिशाभूल होणं अगदीच साहजिक आहे. अश्यावेळी समाजमाध्यमांवरील त्या घटकांची जबाबदारी वाढते, ज्यांना खरोखर आपल्या इतिहासाबद्दल योग्य ती माहिती आहे. पूर्वग्रहदूषित विचार सोडून, हातचे काहीही न घालता, फक्त आणि फक्त सत्यच समोर ठेवावे. आधी देशातील नागरिक जाणता व्हायला हवा तरच देश पुढे जाऊ शकेल. हे आजही तितकेच सत्य आहे जितके तेंव्हा, स्वातंत्र्यपूर्व काळात होते. स्वातंत्र्यवीरांचे विचार जर सर्वदूर पोहचवायचे असतील तर ते आधी आपल्या आत रुजवायला हवे. मग जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तरी ते विचार, ती तत्व तुम्हाला तुमच्या मातीशी घट्ट जोडून ठेवतील.

सावरकरांनी आपल्या तत्वांशी निष्ठा बाळगून हाती घेतलेले हे समाज प्रबोधनाचे व्रत अगदी नेटाने निभावले. ते करताना कधीही खोट्याचा किंवा फसवेगिरीचा मार्ग निवडला नाही. कितीही यातना सहन कराव्या लागल्या तरी आपला मार्ग सोडला नाही.कारण त्यांचं ध्येय त्यांना ठाऊक होतं . ते लिहितात -

***की घेतले न हे व्रत अंधतेने ।***

***लब्धप्रकाश इतिहास निसर्ग माने ।***

***जे दिव्य, दाहक म्हणूनी असावयाचे ।***

***बुद्ध्याची वाण धरिले करी हे सतीचे।।***

अगदी डोळसपणे हाती घेतलेले हे व्रत, आमच्या जाज्वल्य इतिहासाच्या आणि निसर्गाच्या प्रेरणेने आम्ही हाती घेतले आहे, ते दाहक असले तरीही दिव्य असे हे सतीचे वाण आम्ही हाती घेतलेले आहे. आणि खरोखरच, संपूर्ण सावरकर परिवाराने ते व्रत अगदी शेवट पर्यंत जपले. त्यांना ते जपता आले ते फक्त आणि फक्त त्यांच्या जीवनमूल्यांमुळेच. तीच जीवनमूल्ये आपल्याही आयुष्यात असणं खूप महत्वाचे आहे. मग तुम्ही त्यांच्या जन्मदिनी फेसबुक पोस्ट, मोठी मोठी भाषणं, उत्सव, सोहळे काहीही नाही केलेत तरीही चालतील. फक्त त्यांचे विचार आपल्या आयुष्यात आणण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न करा! बस! आपल्याला जर ते जपता आले, जगता आले तर ती स्वातंत्र्यवीरांना खरी मानवंदना असेल.

"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

# पत्रास कारण की...

प्राजक्ता बर्वे

आदरणीय सावरकर पणजोबा,

सा. न. वि. वि

आपल्या नुकत्याच होऊन गेलेल्या जयंती निमित्त आपणास काही गोष्टी सांगायच्या आहेत.

अनेक वर्षांपूर्वी आपण अंदमानच्या काळकोठडीत राहून, प्रचंड कष्ट सहन करून, आम्हाला हे स्वातंत्र्य मिळवून दिलेत.

आपल्यासारखे इतरही लोक आहेत ज्यांनी स्वातंत्र्यासाठी खूप परिश्रम घेतले आज ७५ वर्ष झालीत.... थोडीथोडकी नव्हे ...७५ वर्ष. स्वातंत्र्य मिळून आम्ही आजादी का अमृतमहोत्सव सुद्धा साजरा करतोय... पण परिस्थिती खरंच बदलली आहे का?... ती जैसे थे च आहे हो.

आम्हाला ना केवळ चारच दिवस तुमची आठवण येते... १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, तुमच्या जयंत्या आणि पुण्यतिथ्या....

राष्ट्राभिमान, राष्ट्राबद्दलचे प्रेम, हे केवळ आमच्यात भारत विरुद्ध पाकिस्तान या क्रिकेटच्या सामन्यात किंवा आतंकवादी हल्ल्यातंच उफाळून येतं...

उगाच घेतलेत हो तुम्ही कष्ट....! कारण तुमच्या कष्टाची किंमतच आम्हाला उरली नाहीये... आम्ही देशहितासाठी चंदन होऊन झिजत मरूच शकत नाही.... ही तर खूपच दूरची गोष्ट आहे, अर्थात याला अपवाद आहेतच म्हणूनच आज भारतीय आर्मी नेव्ही आणि एअर फोर्स चं नाव दाही दिशात दुमदुमतंय, पण हे अपवाद वगळता आमच्यातील अनेक देशहितासाठी साधा सिग्नल सुद्धा पाळत नाही हो!... आणि वर त्याच्यासाठी दंड आकारला तर आम्ही पोलिसांना बाजूला नेऊन चिरीमिरी देतो...

कसंय ना पणजोबा, खूपच सहज मिळालंय सगळंच आम्हाला.... त्यामुळेच हे असे

वल्लभभाई पटेल यांच्या, गांधी-नेहरुंच्या, टिळकांच्या स्वप्नातला भारत आमच्याकडून साकार होईल असं मला या क्षणी तरी वाटत नाहीये... कारण कसं आहे

ना आम्ही देशाबद्दल उफाळून येणार प्रेम सोशल मीडियावर पोस्ट टाकून व्यक्त करण्यातच धन्यता मानतो.... सामान्यीकरण असेल कदाचित पण आम्हाला मेहनत करायचीच नाहीये आम्हाला फक्त मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपभोग घ्यायचा आहे...

स्वातंत्र्य म्हंटलं की त्यासोबत येते ती जबाबदारी म्हणजेच जबाबदारी... येतं ते कर्तव्य.... पण आम्हाला हे सगळं नकोय... किंबहूना ते कश्याशी खातात हे सुध्दा अनेकांना माहीत नाहीये... त्यामुळेच याच्याशी आमचा कणमात्र सुद्धा संबंध नाही....

स्वातंत्र्याचा स्वैराचार कधी झाला हे कळलंच नाही हो!! आज आजी-आजोबांना जेव्हा बोलताना ऐकतो ना की हल्लीची पिढी... ही मुलं... तेव्हा एक क्षण टोचून जातं त्यांचं बोलणं... पण दुसऱ्याच क्षणी मनात विचार येतो की खरंच लकी आहोत आम्ही आमचा जन्म स्वातंत्र्यानंतर झाला आम्हाला सगळं काही बघायला मिळतंय... आणि त्यानंतर असं सुध्दा वाटतं की नुसत्या उपभोगाताच आमची पिढी खर्च होईल कदाचित कारण कर्तव्य आणि जबाबदारी ही फक्त सीमेवर लढणाऱ्या सैनिकांसाठी वापरले जाणारे शब्द आहेत...

आम्ही जनता म्हणून फक्त टीव्हीसमोर बसून कमेंट्स पास करणे किंवा सोशल मीडियावर एखाद्याला ट्रोल करणे याच्यातच आमचे कर्तव्य मानतो आणि राजकीयनेते एकमेकांवर कुरघोडी करणे नसलेले आरोप सिद्ध करणे एखाद्याला अडकवणे आणि स्वतः कसे कायम न्यूजमध्ये राहतील यालाच आपले कर्तव्य मानतात..

काय हो पणजोबा तुम्ही!!.... उग्गाचंच केलं एवढं... यापेक्षा तर आम्ही पारतंत्र्यातच जगलो असतो.

***-तुमची पणती***

***ता.क.-***

तुम्ही स्वर्गात अत्यंत दुखी असाल कसा भारत पाहून... बाप्पाशी तुमची पुढची बैठक जेव्हा होईल ना तेव्हा त्याला नक्की सांगा की भारतवासी यांच्यात कमी होत चाललेली देशभक्ती वाढावी आणि भारतीयांना आत्मनिर्भर होण्याची बुद्धी त्या ईश्वराने द्यावी.

# स्वातंत्र्यवीर सावरकर आणि अंधश्रद्धा निर्मूलन

संध्या दुर्गे

स्वातंत्र्यवीर सावरकर यांची नव्याने ओळख करून द्यायची इथे गरज नाहीच. संपूर्ण अंकातून ही ओळख होईलच. सावरकर हिंदूत्ववादी होते हे आपण ऐकले असेलच. ते हिंदुहृदय सम्राटही होते. परंतु ते धार्मिक श्रध्दांचे अवडंबर माजवण्याच्या निश्चितच विरोधात होते किंवा चुकीच्या रुढी परंपराच्याही विरोधात होते. आणि म्हणूनच त्यावर घणाघाती टीका ते करीत असत. आणि अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्यही त्यांनी केले होते. अंधश्रध्दा निर्मुलन करतांना ते मूळ श्रध्दांचा आदर करीत. परंतु देश आणि मानवी विकासास प्राधान्य दिल्या जाईल अशा प्रकारे श्रध्दा पाळाव्यात हे त्यांचे म्हणणे असे.

प्रत्येक श्रध्दा ही त्या त्या काळातील गरजेनुसार निर्माण झालेली असते आणि म्हणूनच ती पुढील काळाकरीता अंधश्रध्दा ठरू शकते, म्हणून काळानुरूप त्यात बदल व्हावेत इतके साधे, सोपे त्यांचे विचार होते. परंतु आजच्या काळातही, सावरकर जाऊन ५५ वर्षे झाली तरीही या गोष्टी ब-याच प्रमाणात तश्याच अंधश्रध्दांच्या रूपात सुरू आहेत.

श्रध्दा, अंधश्रध्दा यांचा अभ्यास काळानुसार विज्ञानाच्या कसोटीवर व्हायला हवा व विज्ञान स्वीकारायला हवे ही त्या ही काळाची गरज होती. प्रकृती बरी नाही, आजार झाला आहे, तर व्रत वैकल्ये, पूजा, बळी करू नका तर त्वरीत डॉक्टरांचा सल्ला व औषधे घ्या, हे स्वा. सावरकरांनी १९३५ च्या सुमारास सांगितलेले वाचायला मिळाले. ते आजही अजून किती सुसंगत वाटते ते गेल्या १-२ दिवसांतील वर्तमान पत्रातल्या बातमी वरून सिध्द होते. अमरावती येथील विज्ञान पदवीधर मुलावर आर्वी येथील मांत्रिकाने उपचार करावे जो अशिक्षित आहे. आणि यात त्या मुलाला प्राण गमवावे लागावेत या परतें दुर्देव ते काय ?

स्वा. सावरकर हे नेहमीच सर्व धर्मांतील अंधश्रध्दा विरोधात लढले. आणि नेहमी मानव हा केंद्रस्थानी असावा, त्याच्याशी मानवतेने वागावे, आधी त्याला खायला/प्यायला मिळावे, उच्च नीच वागणूक त्याला मिळू नये या मताचे होते. ज्या अंधश्रध्दा, व्रत वैकल्ये मानवाला वगळून इतर प्राणी पशूंना महत्व देणा-या असतील त्या श्रध्दांच्या विरोधात ते हमखास राहिले. त्यानंतरचे महत्व ते आपल्या समाज व राष्ट्रास द्यावे असे त्यांचे म्हणणे होते.

त्या काळात त्यांनी महिलांना खरे दान कशाचे असावे हे सांगितले ते खालील परिच्छेदातून दिसून येईल. "तुम्हा हिंदू महिलांस खरे धार्मिक व्रत आचरावयाचे असेल तर आजच्या परिस्थितीत हया हिंदुराष्ट्राची प्रत्यक्ष फल देणारी अशी काहीतरी सेवा प्रत्यही करा ! तुमच्या द्रव्याचे दान, तुमच्या श्रमाचे दान, तुमच्या अन्नाचे दान, प्रसंगी तुमच्या मानाचे नि अवश्य तर प्राणांचेही दान ह्या प्राणप्रिय हिंदुराष्ट्राला द्या ! तोच आजचा ऐहिक धर्म, तोच आजचा पारलौकीक धर्म ! व्रत विधीत जो विवेक आज करावयाचा तो ही हाच !" (अंधश्रध्दा निर्मूलक कथा भाग - २ पृष्ठ क्र. १४४).

अंधश्रध्दा कोणत्याही धर्मातील असो, त्या मानवतेच्या विरोधात असू नये, मानवाच्या प्रगती व विकासाच्या आड येऊ नयेत म्हणून ते प्रत्येक धर्मातील अंधश्रद्धांच्या विरोधात होते, आणि त्या करीता लढा देत राहिले. परंतु त्यांच्या विरोधी असणा-या मतांचाही त्यांनी आदरच केला. ती विरोधी मते व्यक्त करण्यासाठी त्यांनी प्राधान्य दिले. आणि त्या अंधश्रध्दा कशा मानवाला घातक ठरतील ते पटवून दिले.

स्वा. सावरकरांनी त्या काळात (१९३५) विविध धार्मिक श्रध्दांचे अवडंबर माजवून समाजाला दिशाहीन करणा-या प्रथांवर आणि चुकीच्या रुढी परंपरांवर प्रहार व टीका केली. त्यापासून समाजाला दूर करतांना धार्मिक श्रध्दा व रुढी परंपरा नवीन पध्दतीने कशा चालू ठेवता येतील याचा मार्ग देखील सुचविला.

मध्यंतरी स्वा. सावरकरांनी लिहीलेली "अंधश्रध्दा निर्मूलक कथा भाग - १ व भाग - २ ही पुस्तके वाचण्यात आली. त्या पुस्तकांत त्यांनी चुकीच्या रुढी परंपरांवर टिकात्मक आणि धार्मिक श्रध्दांचे अवडंबर माजवणा-या प्रथांवर घणाघाती प्रहार करणाऱ्या कथा लिहील्या आहेत. ते वाचून मन विदीर्ण होतेच. परंतु त्या काळातील रुढी परंपरा दूर करण्याकरीता त्यांना किती कठोर प्रयत्न करावे लागलेत याचा अंदाज येतो. आणि तरीही अजूनही या काळात काही लोक त्याच रुढी परंपरा त्याच पध्दतीने चालवाव्यात हा अट्टहास करतात त्याचे आश्चर्य वाटते. त्यामुळे अंधश्रध्देचे हे जोखड भारतीय मानसिकतेच्या मानेवरून कधी उतरणार असा प्रश्न पडतो. असा हा प्रश्न ही पुस्तके आज वाचतांना सुध्दा तसाच जाणवतो. नमूना दाखल काही गोष्टी या ठिकाणी सांगते. (खरे तर संपूर्ण पुस्तकच वाचण्या सारखे आहे).

नारायणाचे खरे प्रतिक म्हणजे नरच होय. म्हणजेच नारायण प्रसन्न व्हावा असे वाटत असेल तर नुसते व्रत वैकल्ये, दान पुण्य करण्यापेक्षा गरजवंत नर/नारी/बालके यांची सेवा केल्यास, त्याना खाऊ घातल्यास तो अधिक लवकर प्रसन्न होईल हे निश्चितच.

प्रतिकांच्या पुजेने जर देव प्रसन्न होतो (वृक्ष, प्राणी वगैरे) तर तो त्याचे प्रतिक असणा-या मनुष्याच्या सेवेने नक्कीच प्रसन्न होईल. जे का रंजले गांजले, तयासी म्हणे जो आपले, असे परोपकारी मनुष्य सेवेचे व्रतच अंगीकारवयास पाहिजे.

स्वा. सावरकरांनी व्रत वैकल्ये कशी करावीत या विषयी अगदी सहज सोप्या पध्दतीने सांगितले आहे. जसे व्रत वैकल्ये आत्मशुद्धीकरिता, काम्य फलप्राप्ती करीता आणि पुण्य मिळण्या करीता असे हेतू आहेत ते सर्व मनुष्य सेवेने, परोपकाराच्या व्रताने सुध्दा मिळते. त्यामुळे आपण व्रतांची निवड करतांना अशीच व्रते निवडावी ज्या योगे मनुष्य जातीचे प्रत्यक्षपणे काही ना काही तरी हितच साधेल. मनुष्याच्या अज्ञानास वा धर्म भोळेपणास उत्तेजन न देता त्यांचे ज्ञान व सुख वाढविल. त्यामुळे समाजाची, राष्ट्राची, याची देही, याची डोळा फळ देणारी सेवा घडू शकेल.

कोणतेही व्रत निवडतांना, अंगीकारतांना एक कसोटी त्या व्रताला लावून पहावी. जसे - "ह्या दानाने वा कर्माने माझ्या राष्ट्राची काहीतरी प्रत्यक्ष सेवा घडत आहे ना ?" ही कसोटी प्रत्येक व्रताच्या कर्मास वा दानास लावली की संपले. तो व्रतविधी त्या कसोटीस उतरला नाही तर तो साफ सोडून द्यावा नि त्याच काम्य वा निष्काम हेतूने हिंदू राष्ट्राची प्रत्यक्ष सेवा ज्यात घडेल अशा विधीने ते व्रत सुरु करावे. स्वा. सावरकरांनी इतके स्पष्ट विचार व्रतांच्या बाबतीत मांडले आहे.

संक्रांत, विविध ग्रह पूजन, ग्रहण, वट पूजा, कोकीळाव्रत असे आणि अजूनही काही व्रते करावयाची झाल्यास विज्ञानाच्या कसोटीवर तपासूनच घ्यायला हवे. तरी देखील त्यांच्या म्हणण्या प्रमाणे, "त्या व्रतातील जो देवाच्या सेवेचा श्रध्दावंत मनाला उदार करणारा हेतू, तो मात्र सुटता कामा नये" म्हणजे अगदीच देवावर विश्वास नाही, किंवा पूर्णपणे नास्तिक असे मत नाही. ज्यायोगे प्रत्यक्ष व्यवहारात आज मनुष्य जातीचे अल्पस्वल्प हित ही साधता येईल अशा रुपाने ते व्रत आचरावे.

### *विटाळ - सुतक :*

त्या काळातील स्त्रीला घरात राहून विटाळ, सुतक हे सांभाळतांना अतिशय त्रास होत असे, त्यात स्त्रीची प्रकृती, लहान मुलींचा सहभाग याचा विचार स्त्री स्वतःही करत नाही, आणि स्वतःच स्वतःच्या पायावर धोंडा मारुन घेते, या विषयी त्यांनी "विटाळाचे वेड" या कथेत भाष्य केले आहे. त्या दरम्यान होणारा शारीरिक व मानसिक त्रास अंगावर काढत त्या कथेच्या प्रमुख पात्र स्त्रीने आपले प्राण गमावले परंतु सुतक - विटाळ यातून बाहेर यायला ती स्वतःला त्रास असूनही प्रयत्न करीत नाही उलट आपल्या लहानश्या मुलीलाही त्यात लोटते. हे वाचून संताप होतो.'

"सुतक कसे पाळावे" या विषयी फार उत्तम तऱ्हेचे विचार मांडले आहेत. जसे – "जो मृत आहे त्याची साधार कुळकथा नि नातं (बरेचदा ज्यांचा वर्षानुवर्षे पिढयानुपिढया संपर्क नसतो त्यांचेही मरणानंतर कळविले जाते व सुतक पाळावे लागते त्या विषयी)

ही कुटुंब एकत्र जमवून सांगावी, त्याचे गुण गावे, त्यांच्या नावे यथाशक्ती काही रक्कम एखाद्या समाजहितकारक संस्थेस वा सुयोग्य नि सत्पात्र अशा विद्वानास, विद्यार्थ्यास दान द्यावी. समाजीय प्रदर्शनार्थ सुतकांचं निदर्षक म्हणून एखादं त्रासदायक नसलेलं

बाह्य चिन्ह दहा दिवस कुटुंबियांनी वा दुःखितांनी वापरावं थोडक्यात म्हणजे, सार्वजनिक मनुष्याच्या बाबतीत सार्वजनिक सुतक जशी केवळ दुखप्रदर्शक, स्मृतीमूलक अशी सार्वजनिक पध्दतीने पाळतो तसेच ते कौटुंबिक सुतकातही पाळावे.

एकंदरीत सुतक - विटाळ पाळणे हा बहुतांशी स्त्रियांचा प्रांत असल्यामुळे, आणि स्त्रिया चरफडतील, त्रासतील, प्राण सोडतील पण सुतकाची चाल - रीत मात्र सोडणार नाहीत. म्हणून या रुढी मोडण्यात स्त्रियाच खरी अडचण होऊन बसल्या होत्या. या दोन रुढीं विषयी सविस्तर लिहीण्याचे कारण अजूनही स्त्रिया व्रत वैकल्ये आणि सुतक सोडायला तयार नाहीत किंवा अजूनही काही अंशी पाळत आहेत. या पुस्तकात स्वा. सावरकरांनी बऱ्याच चालीरीती, वागणूकी यावर भाष्य केले आहे. त्या करीता ही पुस्तके वाचावीत, हे आवश्यक आहे. त्यावेळीच सावरकर हिंदूत्ववादी असूनही त्यांनी किती योग्य पध्दतीने अंधश्रध्दा, रुढी परंपरा बदलविण्याचे उपाय सांगितले आहेत हे कळेल.

# दोन शब्द सावरकरांसाठी

दिशा टिकेकर

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर म्हणजे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील धगधगते यज्ञकुंड. भारतीय स्वातंत्र्य युद्धातील एक पंचाक्षरी मंत्र म्हणजे सावरकर. प्रखर हिंदू विचारवंत, स्वातंत्र्य सैनिक, वकील तसेच एक उत्तम लेखक, भाषाकारही होते. मातृभूमीसाठी त्यांनी आपले संपूर्ण जीवन अर्पण केले. ब्रिटिश सत्तेची लाचारी न पत्करता त्यांनी कठोर काळ्या पाण्याची शिक्षा भोगली. देशभक्त सावरकर यांचे संपूर्ण आयुष्य तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

चाफेकर बंधूंना फाशी दिल्याचे कळताच लहानग्या सावरकरांनी आपली कुलदेवता 'भगवती' हिच्या पुढे देशाच्या स्वातंत्र्यासाठी 'मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी शपथ घेतली. लहानपणापासूनच सावरकर अत्यंत बुद्धीमान होते. त्यांनी वयाच्या तेराव्या वर्षी लिहीलेला 'स्वदेशीचा फटका' ही रचना त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतो.

१९०६ ला सावरकर बॅरीस्टर होण्यासाठी लंडनला गेले. सावरकरांनी लंडनहून पाठवलेल्या एका पिस्तूलाने अनंत कान्हेरे या क्रांतिकारी देश भक्ताने नाशिकचे कलेक्टर जॅकसन याची हत्या केली. या हत्या प्रकरणात ब्रिटिशांनी सावरकरांना लंडन येथे अटक केली. व त्यांच्यावर खटला चालविण्यासाठी सावरकरांना भारतात आणण्याचे ठरले. कडेकोट बंदोबस्त मध्ये सावरकरांना भारतात आणत असतांना बोट जेव्हा फ्रान्सच्या मार्सेलीस बंदरात थांबली तेव्हा शौचास जायचे आहे असे सांगून सावरकर तेथून निघाले व शौचालयातील शौचकूपा द्वारे ते पोर्ट होल मध्ये पोहोचले व तिथून थेट समुद्रात उडी मारुन फ्रेंचची हद्द गाठली. मात्र त्यांचा डाव फसला व ब्रिटिश सैनिकांनी सावरकरांना फ्रेंच येथे पकडले व परत बोटीवर आणले. भारतात आल्यावर न्यायालयाने सावरकरांना ५० वर्ष काळ्या पाण्याची शिक्षा सुनावली.

साहित्य क्षेत्रातही सावरकरांचे योगदान फार मोठे आहे. त्यांनी विपुल आणि दर्जेदार साहित्य निर्मिती केली आहे. कवी, कादंबरीकार, निबंधकार, आत्मचरित्र लेखणी अशा विविध भूमिकांमधून त्यांनी आपली साहित्यसंपदा सृजन केली. रत्नागिरी येथे असतांना सावरकरांनी माझी जन्मठेप, तेजस्वी तारे, शत्रूच्या शिबीरात, माझ्या आठवणी इत्यादी ग्रंथसंपदा त्यांनी निर्माण केल्या. 'कमला' हे अंदमानला रचलेले सावरकरांचे महाकाव्य आहे. कादंबरीकार म्हणून 'काळे पाणी' ही त्यांची कादंबरी आत्मानुभव सांगणारी आहे. तर 'बंड' ही कादंबरी केरळ मधील मलबार जिल्ह्यातील

घटनांचा वेध घेणारी आहे. त्यांची 'लंडनची बातमीपत्रे' यात लंडनमधील वास्तवकालात घडलेल्या विविध घडामोडींचे चित्रण अतिशय सुंदररीत्या मांडली आहे.

५० वर्ष अंदमानाची काळ्या पाण्याची शिक्षा, बंद कोठडी, सोबतीला चार भिंती अशा वेळी काट्याने भिंतीवर सावरकरांनी रचलेले 'कमला' हे नितांत सुंदर खंडकाव्य. सुर्यासम प्रखर व्यक्तिमत्व असणारे सावरकर 'कमला' काव्यात मात्र चंद्राप्रमाणे शीतल वाटतात. तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या कमलेच्या नाजूक भावना सावरकर हळूवारपणे उलगडतात. पुरूषाला पण स्त्री मन कळू शकत मात्र त्यासाठी सावरकरांसारखे संवेदनशील मन असाव लागतं.

सावरकरांनी मार्सेलीसला बोटीवरून निसटण्याचा प्रयत्न केला. आपण बोटीतून निसटण्याचा प्रयत्न केला म्हटल्यावर त्याचा सूड म्हणून इंग्रज आपला छळ हा करणारच. अशा धैर्याचा पुरवठा करण्यासाठी, इंग्रजांना पुरून उरण्यासाठी सावरकरांनी 'आत्मबल' ही कविता लिहिली.

***अनादि मी, अनंत मी, अवघ्या मी भला***
***मारिल रिपु जगति असा कवण जन्माला***

सावरकर इंग्रजांना ठणकावून सांगतात, मी मृत्यूला घाबरत नाही. तोच मला पाहून पळून जातो.

***असे जगावे दुनियेमध्ये आव्हानांचे लावूनी अत्तर***
***नजर रोखूनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर***

"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

# काव्य आणि क्रांती यांचा संगम

अंजली उपाध्ये

***दिव्यत्वाची जेथे प्रचिती ,***

***तेथे कर माझे जुळती***

जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरलं गेलेलं तसेच आकाशाला गवसणी घालावी आणि सागराला कवेत घ्यावं असं उत्तुंग, बहुआयामी ,शतपैलू व्यक्तिमत्व म्हणजे क्रांतीसुर्य भगूर पुत्र विनायक दामोदर सावरकर.

भारताच्या स्वातंत्र्य इतिहासातील ओजस्वी पर्व, अलौकिक प्रतिभेचे महाकवी, काव्यातून क्रांती आणि क्रांतीतून काव्य हे सावरकरांच्या जीवनाचे रहस्य होते. अस्खलित वक्तृत्व आणि प्रमाणाबाहेर साहस या दोन गुणांचे बाळकडू त्यांना घरातूनच मिळाले होते. जिव्हा आणि लेखणी ते सारख्याच ताकदीने चालवत .प्रल्हाद केशव अत्रे यांनी त्यांना "स्वातंत्र्यवीर" ही उपाधी बहाल केली होती .झाले बहु होतील बहु पण या सम हा या उक्तीचे उदाहरण आहे वीर सावरकर !

वीर सावरकर म्हणजे देशाला जोडणारी शक्ती आहे. देहापासून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि मी त्याचं देणे लागतो यावर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच वाटते आधुनिक हिंदुत्वाचा पाया आणि ओळख होते सावरकर. ते आज आपल्यात नाहीत पण जोपर्यंत चंद्र सूर्य आकाशात आहेत तोपर्यंत त्यांचे विचार हिंदूंना मार्गदर्शकच ठरतील.

अखंड भारत हे त्यांचं स्वप्न होतं. काश्मीरच्या नंदनवना पासून तर मलयगिरीच्या चंदनवना पर्यंतचा सारा हिंदुस्तान आमचा आहे असे त्यांचे मत होते .पु.ल.देशपांडे म्हणत चैतन्याने न्हाऊन निघालेले शब्द हे सावरकरांचे प्रखर शस्त्र होते व त्यांच्या सारख्या सिद्ध पुरुषांनी उच्चारल्याने त्या शब्दांना मंत्राचे सामर्थ्य येत असे म्हणूनच सावरकरांविषयी लिहिणे म्हणजे ,"ज्योतीने तेजाची आरती" करण्या सम होईल.

देशासाठी सर्वस्वाची होळी करणारे, महान दैवी शक्ती घेऊन भारत मातेच्या उदरी २८ मे १८८३ ला नाशिक जिल्ह्यातील भगूर ह्या गावी विनायक दामोदर सावरकर जन्माला आले. दामोदर पंत आणि राधाबाई यांचे हे दुसरे अपत्य .सावरकरांना वयाच्या नवव्या वर्षीच आपल्या आईला गमवावे लागले .त्यांचा व त्यांच्या भावंडांचा सांभाळ वडिलांनी आईच्या मायेने केला .१८९९मध्ये प्लेगच्या साथीत पितृछत्र हरवल्यानंतर

अवघ्या तेराव्या वर्षी सावरकरांनी रचलेल्या स्वदेशीचा फटका आणि स्वातंत्र्याचे स्तोत्र ह्या रचना त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात. चाफेकर बंधूंना फाशी दिल्याचे वृत्त समजताच वयाच्या पंधराव्या वर्षी १८९८ साली सावरकरांनी त्यांच्या कुलदैवते समोर भगवती समोर मातृभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी सशस्त्र क्रांतीची ,"मारिता मारिता मरेतो झुंजेन "अशी शपथ घेतली. १८९९ मध्ये राष्ट्रभक्त समुह व १९०० मध्ये मित्रमेळा संघटनांची स्थापना केली. १९०४ मध्ये मित्रमेळाचे नाव बदलून अभिनव भारत असे नाव ठेवले. मदनलाल धिंग्रा हा त्यांच्या अभिनव भारताचा पहिला हुतात्मा शिष्य होय. १९०१मध्ये यमुना बाईशी त्यांचा विवाह झाला. त्या नंतर १९०२ मध्ये पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. मुंबईतून L.L.B. चे शिक्षण पूर्ण करून १९०६ मध्ये कायद्याच्या उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले.

***असे जगावे दुनियेमध्ये आव्हानाचे लावुन अत्तर***
***नजर रोखुनी नजरे मध्ये आयुष्याला द्यावे उत्तर***

राष्ट्र मुक्तीसाठी देशभक्तांमध्ये जशी बौद्धिक उंची असावी लागते तसेच त्यांच्या मन आणि मनगटातही सामर्थ्य असावे लागते ते सावरकरांच्या ठायी होते. भारताची राष्ट्रीय समस्या आंतरराष्ट्रीय क्षितिजावर मांडण्यासाठी त्यांनी सशस्त्र हालचाली सुरु केल्या. परदेशातील भारतीय तरुणांना संघटित केले .बॉम्ब तयार करण्याचे तंत्र अवगत केले .अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ लिहिला आणि भारताच्या तरुण रक्तात राष्ट्रभक्ती उफाळून आली. वीर सावरकरांच्या जीवनाचे एकच लक्ष होतं, आपल्या प्राणाहून प्रिय राष्ट्राची स्वतंत्रता ,उन्नती आणि समृद्धी. देश हेच त्यांचं जीवन होतं .देश कार्य म्हणजेच देवकार्य हे त्यांचे मत होते .देशासाठी जीवनाची बाजी लावणे हा त्यांचा धर्म होता.

सावरकरांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगला. त्यांनी अनेक पर्यायी शब्द विदेशी शब्दा ऐवजी मराठी भाषेला दिले. त्यातील काही आजही अत्यंत प्रचलित आहे. दिनांक, नगरपालिका, महानगरपालिका, दूरदर्शन, महापौर, दिग्दर्शक, अर्थसंकल्प, विधिमंडळ, आदी. सावरकर प्रथम असे स्नातक होते की, ज्यांची बॅरिस्टर पदवी ब्रिटिश सरकारने स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतल्याने हिसकावून घेतली.

सावरकर प्रथम असे व्यक्ती होते की ज्यांनी पुर्ण स्वातंत्र्य हे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे लक्ष्य घोषित केले. ते प्रथम असे भारतीय विद्यार्थी होते की ज्यांनी इंग्लंडच्या राजा प्रति निष्ठावान असण्याची शपथ घेण्याचे नाकारले. सावरकरांची मार्सेलिस बंदरा मध्ये मारलेली उडी दुर्दैवाने निष्फळ ठरली आणि सशस्त्र क्रांतिकारकांच्या या महामेरुला जगाचा असा एकमेव महायोद्धा व्हावं लागलं ज्याला २-२ जन्मठेपेच्या शिक्षा झाल्या. पण त्यावेळीही ते डगमगले नाही.

***अनादि मी, अनंत मी ,अवध्य मी, भला***

***मारील मजला कवण रिपू असा जन्मला***

असं म्हणत महाकाव्य लिहिले. १९११ साली झालेल्या काळया पाण्याच्या शिक्षेस्तव ब्रिटिश सरकारने सावरकरांना अंदमानच्या काळकोठडीत डांबले. तेथील त्यांना होत असलेल्या मरणप्राय वेदना सहन करीत असतानाही त्यांच्या समोर एकच ध्येय होते मातृभूचे स्वातंत्र्य ! ११ वर्षे छळ सहन करूनही सावरकरांचे सर्जनशील कवित्व आणि बंडखोर क्रांतिकारकत्व तसूभरही कमी झाले नाही .अंदमानातील एकांतवासात त्यांची काव्य प्रतिभा बहरली व त्या उर्मीतच तुरुंगाच्या भिंतींचा कागद आणि खिळ्यांची लेखणी करून त्यांनी "कमला" सारखे खंड काव्य लिहिले.

विठ्ठल पटेल ,रंगास्वामी अयांगर, जमनादास मेहता यांच्या प्रयत्नांमुळे सावरकरांची अंदमानातून सुटका झाली. त्यांना रत्नागिरीत नजर कैदेत ठेवण्यात आले. तेथे त्यांनी हिंदुत्व आणि माझी जन्मठेप हे आत्मचरित्र लिहिले. १९२४ साली त्यांना अनेक शर्ती व अटींवर मुक्त करण्यात आले. सावरकर हे केवळ क्रांतिकारकच नव्हते तर ज्वलंत साहित्यिक ,समाजसुधारक ,हिंदुसंघटक आणि बुद्धिवादी विज्ञाननिष्ठ राष्ट्रभक्त होते. १९२६ मध्ये त्यांनी श्रद्धानंद साप्ताहिक सुरु केले. त्यांचे व्यक्तिमत्त्व अष्टादशपैलू असे होते. ते थोर समाज सुधारक होते. जातीभेद हा मनाचा रोग आहे तो मानला तर धरून राहतो नाही मानला तर बरा होतो" असे ते मानत. रत्नागिरीत त्यांनी स्थानबद्ध असताना जातीपातीच्या निर्मूलनासाठी पतितपावन मंदिर उभारले सामाजिक समतेचा अध्याय सुरु करणारे जणू क्रांतिपर्वच होते सावरकर !

१९३७ ते १९४४ असे सात वर्ष त्यांनी हिंदुमहासभेचे अध्यक्षपद भूषवले. झंझावाती दौरे, मोठ्यामोठ्या सभा, रॉयल क्लबची स्थापना, अशा अनेक मार्गांनी त्यांनी हिंदू महासभेचे कार्य केले. आधुनिक विचारधारे प्रमाणे बुद्धिवाद व विज्ञाननिष्ठा यांची कास धरून हिंदू धर्माच्या सुधारणेसाठी लढा दिला.

१९३८ साली त्यांनी मुंबई येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले. १९५९ मध्ये त्यांना पुणे विद्यापीठातर्फे त्यांना डि.लीट ही पदवी प्रदान करण्यात आली.

त्यांची कमला, गोमांतक, महासागर ही महाकाव्य काळेपाणी या सारखी कादंबरी. सन्यस्त खड्ग ,उत्तरक्रिया , उ:शाप ही संगीत नाटकं माझी जन्मठेप हे आत्मचरित्र , विज्ञाननिष्ठ निबंध लेख सागरा प्राण तळमळला, हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजी राजा या सारखी गीते ,पोवाडे अशी वाङ्मयीन साहित्य संपदा अजरामर आहे. सुमारे ६० वर्ष या पुरुषोत्तमाने स्वातंत्र्य आणि सुराज्य स्थापनेसाठी अथक परिश्रम घेतले.

*तुजसाठी मरण ते जनन*

*तुजवीण जनन ते मरण*

असे म्हणत स्वातंत्र्य देवीला सांगणारे आमचे स्वातंत्र्यवीर सावरकर ! आपले धाडस व साहित्याच्या बळावर समाजात प्रबोधन घडविणाऱ्या या महान नेत्याला अत्यंत कृतज्ञतेने वंदन करावेसे वाटते. सावरकरांचे चरित्र म्हणजे आपल्या पिढीसाठी जपून ठेवण्यासारखा अमूल्य आणि अविस्मरणीय ठेवा होय .अटल बिहारी बाजपेयी एका भाषणात सावरकरांचे वर्णन करताना म्हणतात ,

सावरकर म्हणजे बहुरंगी व्यक्तिमत्व, सावरकर म्हणजे तलवार, तीर, सावरकर म्हणजे त्याग, सावरकर म्हणजे तेज, सावरकर म्हणजे तत्त्व, सावरकर म्हणजे तर्क, तितिक्षा, सावरकर म्हणजे धगधगते अग्निकुंड होय.

*ने मजसी ने परत मातृभूमीला*

*सागरा प्राण तळमळला*

देशाकडे पाहून जीव तळमळणाऱ्या या महान नेत्याने २६ फेब्रुवारी १९६६ रोजी प्रयोपवेशनाद्वारे आपले अवतार कार्य संपवले . या महामृत्युंजयाला माझा मानाचा मुजरा.

# बहुआयामी सावरकर

दीप्ती शिंदे

खरं तर आज हा जो लेख तुम्ही वाचत आहात तो लिहून देण्यासाठी माझ्याकडे पुरेसा वेळ होता, किंबहुना पुष्कळ वेळ होता. पण तरीही हा लेख पूर्ण करणं सहज शक्य नव्हतं. कारण एकच - हा लेख ज्या विभूतीबद्दल आहे तिच्याबद्दल काहीही लिहिताना, बोलताना कोठून सुरुवात करावी आणि कोठे थांबावं हे भल्याभल्यांना ना कळत नाही, तिथे माझ्या प्रतिभेचं सामर्थ्य कोठे पुरं पडणार? पण तरीही ह्या विभूतीबद्दल जे काही मी लहानपणापासून ऐकलं होतं, वाचलं होतं ते सगळं आठवता आठवता त्याला आंतरजालावर उपलब्ध असलेल्या लेखनपुराव्यांची पुस्ती मिळवत मी हा लेख पूर्ण केला आहे.

कोण आहे ही महान विभूती?

ही ती आहे जिचं नाव घेण्याआधी स्वातंत्र्यवीर हे शब्द आपोआप ओठी येतात; ज्यांचे  तत्व, मूल्य, विचार आणि एकूणच अस्तित्व हे कालातीत आहे आणि जिच्या उल्लेखाशिवाय भारताच्या इतिहासाचाच काय तर वर्तमान आणि अगदी भविष्याचाही पूर्ण विचार करणं शक्य नाही... विनायक दामोदर सावरकर अर्थात स्वातंत्र्यवीर सावरकर.

सावरकरांबद्दल अनेक तत्त्वज्ञांनी आणि विचारवंतांनी अनेक मतं, निरीक्षणं आणि पर्यायाने अनेक विशेषणं नोंदवली आहेत. त्यातीलच काही विशेषणांचा आपण इथे मागोवा घेऊयात.

### *सावरकर एक अज्ञेयवादी:*

अनेकजण म्हणतात की सावरकर नास्तिक होते. कदाचित त्यांच्याकडे तसे काही पुरावेही असतील पण सावरकरांच्या दोन कविता हे अधोरेखित करतात की सावरकर कधीच नास्तिक नव्हते. पहिली कविता - अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला...भारतीय परंपरेनुसार अनादि, अनंत, अवध्य काय आहे? अर्थात आत्मा. मग आत्म्यावर विश्वास ठेवणारा नास्तिक असू शकतो का? ह्याच कवितेतील अजून दोन ओळी - ***हलाहला त्रिनेत्र तो, मी तुम्हासी तैसाची गिळुनी जिरवितो ॥*** इथे त्रिनेत्र म्हणजे कोण? हलाहल म्हणजेच विष प्राशन करणारा त्रिनेत्र म्हणजेच शिव. स्वतःच्या पराकोटीच्या तीव्र भावनांच्या आविष्कारात सावरकर जिथे शिवशंकराचं नाव घेतात तिथे सावरकरांना नास्तिक म्हणणं किमान माझ्यातरी बुद्धीला पटत नाही.

ज्या दुसऱ्या कवितेबद्दल मी बोलत होते ती कविता म्हणजे - अज्ञेयाचे रुद्धद्वार. ह्या कवितेतील काही ओळी पाहुयात -

*ठोठावित थकलो, अजुनि नुघडती बा रे*

*आंतुनि तुझी ती बंद सदोदित दारे*

*विस्तीर्ण अनंता भूमी*

*कवणाहि कुणाच्या धामी*

*ठोठावित बसण्याहूनि*

*घेईन विसावा लव मी*

*येईन ना पुन्हा तुझ्या घरा ज्याची रे*

*ही वज्रकठिणशी बंद सदोदित दारे*

ह्या ओळी आणि ह्या कवितेचं शीर्षक सावरकर अज्ञेयवादी होते हे सांगण्यास पुरेसं आहे.

### *सावरकर एक उपयुक्ततावादी:*

सावरकर मानत की जर आपल्या विद्येचा, गुणांचा भारताला स्वतंत्र करण्यासाठी उपयोग करता आला नाही तर ते व्यर्थ आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीसुद्धा त्यांनी भारतीय तरुणांना सैन्यामध्ये भरती होण्याचा सल्ला दिला. त्यामुळे त्यांना टीकेलाही सामोरे जावे लागले पण ह्या सल्ल्यामागे सावरकरांचा उद्दात्त विचार होता. जर आज भारतीय तरुण ब्रिटिश सैन्यात भरती झाले तर त्यांना सैनिकी प्रशिक्षण, विविध शस्त्रं वापरण्याचं ज्ञान आणि युद्धनीती आपोआप कळेल आणि याचा आपण भारताच्या स्वातंत्र्यासाठी नक्कीच फायदा करून घेऊ शकतो, असा ठाम विश्वास सावरकरांना होता.

इतकेच नव्हे तर अंदमानात शिक्षा भोगत असतानाही सावरकरांनी तेथील अशिक्षित कैद्यांना शिक्षण दिलं, त्यांना बाहेरील जगाची ओळख करून दिली, त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार केले आणि त्यांच्यातील वीरवृत्तीचा उपयोग त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आणि प्रगतीसाठी करावा यासाठी प्रेरणा दिली.

### *सावरकर एक बुद्धीवादी आणि विज्ञानवादी:*

विश्वाचे सत्य केवळ विज्ञानच शोधून काढू शकते यावर सावरकरांचा असीम विश्वास होता आणि श्रुतिस्मृतीपुराणोक्ताऐवजी वैज्ञानिक संशोधन ग्रंथ यांनाच त्यांनी आपले धर्म ग्रंथ मानल्याचं दिसून येतं. विज्ञान कसं श्रेष्ठ आहे हे सांगताना सावरकर 'यज्ञाची कुळकथा' मध्ये म्हणतात - वेदांपेक्षा विज्ञानाने हे सूर्य, अग्नी, प्रकाश सोम कसे

तात्काळ आणि बिनचूक माणसाळले जातात. हिंदू धर्मातील वैज्ञानिक दृष्टीकोन अधोरेखित करताना सावरकर म्हणतात - असतो मा सद्गमय, ओम सहनाववतु किंवा दीप:ज्योती नमोस्तुते असं म्हणणारा आपला धर्म विज्ञानाच्या विरोधात जातच नाही. तो विज्ञानाला पूरकच आहे. आपण आपल्या धर्माला समजून घेण्यात चुकतो. सावरकरांच्या मते दुर्बीण म्हणजे मनुष्य नेत्राची असीमता आणि दूरध्वनी म्हणजे मनुष्य कर्णाची अमर्याद शक्ती. तंत्रज्ञानावर, अत्याधुनिक उपकरणांवर आणि एकूणच विज्ञानावर सावरकरांचा प्रखर विश्वास होता.

सावरकर अज्ञेयवादी कसे, त्यांना उपयोगितावादी का मानतात, त्यांना बुद्धीवादी आणि विज्ञानवादी का म्हणतात, ते थोर समाजसुधारक का होते, त्यांनी भाषाशुद्धी कशी केली, ह्या आणि अशा अनेक गोष्टींबाबत खरं तर बरंच काही बोलता येईल. पण सगळंच इथे लिहिता येणं शक्य नाही कारण सावरकर हा विषयच अनंत आहे, बहुआयामी आहे. त्यातील प्रत्येक पैलू शब्दबद्ध करणं निव्वळ अशक्य आहे. म्हणूनच इथेच थांबते.

"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

# काळे पाणी

वर्षा पतके थोटे

काळे पाणी म्हटले की, आपल्याला आठवतात ते 'वीर सावरकर ' आणि त्यांनी लिहिलेली " काळे पाणी " ही कादंबरी. सन १९३७ मध्ये ह्या कादंबरीची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. मी वाचली ती ह्या कादंबरीची सातवी आवृत्ती. या कादंबरीत मालती, किशन, रफिउद्दीन या पात्रांभोवती कादंबरीचे कथानक आहे. हे कथानक केवळ काल्पनिक नाही किंवा या अनुषंगाने येणारी पात्रांची नावेही मूळच्या नावाशी मिळतीजुळतीच आहेत. असं प्रस्तावनेमध्ये ' बाळ सावरकरांनी ' म्हटलेलं आहे.

"काळे पाणी " ही एक सजा होती इंग्रजी राजवटीत. सा-या अपराधात जे अत्यंत घातक आणि नृशंस अपराध असतात, तो ज्यांच्या हातचा मळ झालेला आहे अशा हत्यारी, आगलाव्या, विषदायी, दरोडेखोर इत्यादी अट्टल पाप्यांना बहुधा काळ्या पाण्याची शिक्षा देण्यात येते. त्यातही पुन्हा चाळणी होऊन जे अतिवृद्ध, अल्पवयी, इकडील बंदिशाळेत सद्वर्तनाने सुधारणीस ठरलेले ते वगळून उरलेले ते अट्टलांतील अट्टल अपराधी, बहुधा त्यांनाच काळ्या पाण्यावर पाठविण्यात येते. राजकीय प्रकरण वगळले तर कोणत्याही सुव्यवस्थित समाजाला ज्यांचे अस्तित्व एखाद्या महामारीच्या साथीसारखेच भयप्रद वाटल्यावाचून राहणार नाही, असेच उग्र, हिंसक, उच्छृंखल खल ह्या काळ्या पाण्यावर धाडण्यासाठी काढलेल्या 'चलाना ' त भरती केलेले असतात. अपवाद सोडले तर नियम असा हाच. असे वीर सावरकर ' अंदमानचे चलान ' या प्रकरणात लिहितात.

'चलान ' म्हणजे तुरुंगा- तुरुंगातून साचलेले काळ्या पाण्यावरचे दंडित एकत्र करून अंदमानला धाडण्यासाठी त्या धक्क्यावरील पटांगणात ज्या एका एका गटाने आणण्यात येतात तो गट. कलकत्त्याच्या बंदरावरील धक्क्यावर हे सगळे ' चलान ' एकत्रीत करून ' जहाजाने ज्याचे नाव " महाराजा " होते. ते पाठवित असत. पण आताशा ही शिक्षा शिथिल करण्यात आल्यामुळे तिची दाहकता आपल्याला माहितच नाही. पण जेव्हा आपण " काळे पाणी ". वाचायला घेतो. तेव्हा लक्षात येतं की, अरे किती भयंकर आहे हे. भयंकर हा शब्दही थिटा पडावा आणि आपण वाचता वाचता आपल्याच विचारांच्या खोल गर्तेत वावटळीसारखे गोल गोल फिरत राहावे. ' काला पाणी आता ' कादंबरीतील या बंदिवानाच्या वाक्याने खाडकन जमिनीवर यावे.

मालती एक कोवळ्या निर्मल फुलाची अर्धफुल्ल कळी होती. वयात येणारी पोर, दिसायला जणू शरद ऋतुतील चंद्रकोर. पण नियती sss नियती म्हणतात ती हीच का ?

असा प्रश्न आपल्याला मालतीचे जीवन वाचताना पडत जातो. काहीही अपराध नसताना एक असह्य दुर्दशा मालतीच्या वाट्याला येते. इतकी की, सहानूभुतीपुढेसुद्धा उघडी करून सांगता येऊ नये. आडदांड, ओंगळ आणि अभद्र नरपशू गुलाम हुसेन ची अघोरी वासना मालतीच्या लज्जेचा बळी घेत जाते. तेव्हा आपल्या अंगाची जी आग होते ती शब्दातित आहे. तिच्या कोवळ्या भावनांची झालेली राख तर कुणाच्या खिजगिणतीतही दिसत नाही. त्या अगोदर दुर्दशेतून सोडवायला एक ' किशन ' जो स्वतःच मुर्दाड उल्लू आहे तो पुढे येतो आणि दोघं मिळून त्या नराधम गुलाम हुसेनला यमसदनी पाठवतात. त्यानंतर खुनाच्या आरोपाखाली दोघांनाही झालेली काळ्या पाण्याची शिक्षा. कोवळ्या, मुर्दाड मनाला किती कणखर बनवते हे कादंबरीतील प्रत्येक शब्दांच्या अंतरात जाणवत राहते. ही कादंबरी वाचताना एक अनाकलनीय गुढ आपली सोबत करत असतं. पण तरीही न भिता न डगमगता आपण कादंबरी वाचनात गढून जातो.

अंदमानला आताशा भयंकर आणि निर्ढावलेले (Habitual) बंदी धाडण्यात येत नाहीत. त्यामुळे तिकडील बंदिवानांना बऱ्याच सवलती आजकाल मिळतात; पण तीस-पस्तीस वर्षांपूर्वी भयंकर आणि निर्ढावलेले असे अट्टल दंडितच बहुधा तिकडे धाडण्यात येत असल्यामुळे त्यांना राबवून घेण्यासाठी तसेच कडक नियम आणि त्यांची दुष्ट रग जिरवण्यासाठी तसेच सक्त काम योजावे लागे. त्यावाचून दुसऱ्या कोणत्याही लेच्यापेच्या व्यवस्थेला तसले राक्षसी दंडित ताळ्यावर आणणे आणि समाजाला हितकारक अशी कामे त्यांच्याकडून करवून घेणे, निदान पक्षी समाजाला त्यांच्या स्वैर अस्तित्वापासून भोवणारा उपद्रव टाळणे,जवळ जवळ असाध्यच होते असे लेखक म्हणतात.कारण सगळे जरी नाही तरी, रफिउद्दीन सारखे क्रूर, उलट्या काळजाचे काही दंडित कितीही साखळदंडांनी बांधून ठेवा. ते आपला मुळ स्वभाव सोडणाऱ्यातली नव्हते.

बंदिवानाच्या अपराधांच्या आणि पूर्ववृत्ताच्या अनुरोधे निरनिराळे वर्ग पाडून, जे तात्कालिक उत्क्षोभात अपराध करून गेले आणि प्रथमच दंडित त्यांचा सुधारणीय म्हणून एक वर्ग. ज्यामध्ये किशन आणि मालती हे मोडत होते. आणि जे निर्ढावलेले अपराधी त्यांचा भयंकर म्हणून दुसरा वर्ग. ज्यामध्ये रफिउद्दीन सारखे उलट्या काळजाचे क्रूर, असे दोन वर्ग होते. रफिउद्दीन दुस-यांदा झालेली काळ्या पाण्याची शिक्षा भोगायला आला होता. पहिली शिक्षा पूर्ण न करता तो फरार झाला आणि योगानंद बनून निरागस कोवळ्या मालतीच्या जीवनाचा " काळ " बनला. अंधाराच्या पकडीत गवसून सोनेरी पश्चिम अशी काळवंडलेली मालती अलाहाबादच्या त्या भयाण एकलकोंड्या अंधकारातून पोहचली ती अंदमानच्या काळ्या पाण्याच्या शिक्षेसाठी. तिचा दोष काय होता ? तर काहीच नाही. दोष होता तो फक्त एक स्त्री म्हणून सुंदर असण्याचा आणि नशिबाचा. योगानंद उर्फ रफिउद्दीनला ती हवी होती आणि नियतीचा बळी ठरली ती एक कोवळी मालती.

पुरुषी कोठडीत किशन तर स्त्री कोठडीत मालती. पण गुलाम हुसेनच्या खूनानंतर कायद्यासमोर बहीण भाऊ म्हणून शिक्षा भोगत असताना कंटक आणि कंटकीचा डाग मस्तकावर घेऊन मरणासन्न यातना भोगत होते ते मालती आणि किशन. नियतीचे चक्रही मोठे विचित्र आहे. ज्या माणसांमुळे मालतीचे आयुष्य धुळीस मिळाले त्याचाच आधार घेवून काळ्या पाण्याच्या बेटावरुन पळून जाण्याची मदत मिळावी आणि सुखकर आयुष्याची स्वप्न रंगवत आपल्या देशात परत येताना पुन्हा नियतीने घात करावा तो ही कायमचाच. एखादा जीव फार अभागी असतो आणि त्याच्या सानिध्यात येणा-या लोकांनाही त्या अभागी पणाच्या झळा काही अंशी भोगाव्याच लागतात. पण म्हणतात ना नियती पुढे कोणाचे काहीच चालत नाही. तेच खरं.

अंदमानातून पळून गेल्यानंतर तिथल्या आदिम जातीची आणि त्यांच्या चालीरिती, प्रथा यांच्याविषयी जे लेखकाने सविस्तर लिहिलं त्यावरुन आपण म्हणजे आपले मुळपुरुष कसे जगले असतील या पृथ्वीवर याची कल्पना येते. अंदमानला इतिहास नसला, तरी मनुष्यसमाज मात्र आहे. इतकेच नव्हे तर जो त्याचा मूळचा मनुष्य समाज आज अंदमानला आहे. तो ऐतिहासिक गणनेच्या भाषेत तरी अगदी अक्षरशः अनादि आहे. कारण तेथे आज ज्या मूळच्या रानटी, आदिम मनुष्यांच्या जाती निवासत आहेत. त्यांच्या अस्तित्वाचा प्रारंभच सापडत नाही. अगदी प्राचीनतम काळापासून , क्वचित मर्कटांचा मनुष्य होत आला तेव्हापासून त्या जशाच्या तशा आजही जवळजवळ होत्या तेथेच, बहुतांशी होत्या तशाच निवासत आहेत.

या अंदमानातील अगदी अनादिकालापासून निवासात आलेली जाती जी ' जावरा ' ती काही काही शेपटीचे हाड नसलेली होती असे लेखक म्हणतात. पण या जावऱ्यांचे जीवन म्हणजे एक रानटीपणाच. तेथील विस्तीर्ण आणि घनदाट कान्तारामध्ये मोठमोठ्या टेकड्यांमधून त्यांच्या टोळ्या निरनिराळ्या स्थानी वसलेल्या आहेत. जी टोळी मिळून राहते. तेच त्यांचे राज्य. तर असे हे जावरे अंदमानच्या भुमीचे मालक त्यामुळे बंदिवानांनी शिक्षेतून पळून जायचं म्हटलं तरी या जाव-यांना ओलांडून शक्यच नव्हते आणि ही अनादि लोकं म्हणावी तितकी वाईट जरी नसली तरी सगळीच गळचेपी.

भाषेची, बोलण्याची, खाण्याची, वागण्याची. पण तरीही रफिउद्दिन सारखा अमानुष व्यक्ती यांनाच हाताशी धरून शिक्षेतून पळून जातो आणि तरीही दुसऱ्या शिक्षेत ही पळून जायचा प्रयत्न करतो. पण मालतीचा भाऊ जो सैन्यात होता, त्याच्यावर पण काही कारणाने काळ्या पाण्याची शिक्षा लादण्यात येते. तेव्हा तो ही पळून जाऊन या जाव-यांचा 'डोलकाठी' बनून राहतो. तो रफिउद्दीनचा सुड घेतो. या सर्व कथानकात मला भावला तो किशन जो कंटक बनून राहतो...जो मुळात मूर्दाड उल्लू होता. पण परिस्थिती त्याला एवढं कणखर बनवते की, तो मालती वरच्या प्रेमापोटी या कादंबरीचा नायक वाटतो.

एक प्रेम माणसाला अंतर्बाह्य किती बदलवू शकते आणि जीवनातील भल्या भल्या दिव्यांना ही सामोरी जाऊ शकते याचं मुर्तिमंत उदाहरण म्हणजे किशन उर्फ कंटक. किशन-मालतीच्या प्रेमाला कांदबरीत जरी एक गंतव्य मिळालं नसलं तरी माझ्यासारख्या वाचकांच्या मनात मात्र कायमचं ठाण मांडून गेलंय. शाळेत असताना पासून' काळे पाणी आणि अंदमान' हे समीकरण फारच भयप्रद वाटायचं. ही कादंबरी वाचताना ते भय सोबत होतंच, आणि जाणवली मग त्यातली दाहकता, अमानुषता आणि रानटीपणा. हा लेख संपवताना एवढंच म्हणावसं वाटतं. या कादंबरीत जेवढे म्हणून प्रत्येकाचे जीवन दाखविले आहे. तसे जीवन कुणाच्याही अगदी शत्रूच्याही वाट्याला न येवो. एक वाचक म्हणून वाचताना एवढा त्रास झाला तर लेखक म्हणून ' वीर सावरकरांना' ही कादंबरी लिहिताना किती त्रास झाला असेल हा आपण विचारही करू शकत नाही. त्यांच्या लेखणीला आणि त्यांनाही कोटी कोटी प्रणाम....

"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

# स्वर्गातील सावरकर

पल्लवी चिकारे- पळसकर

स्वर्ग कसा असतो हे आपण ऐकले आहे आणि बरेचदा सिनेमांमध्ये बघितले आहे. असं म्हणतात स्वर्ग त्यांना लाभतो जे त्यांच्या आयुष्यात नेहमी चांगली कामे करतात.

आपल्या भारत देशाला ज्यांच्या बलिदानातून स्वातंत्र्य मिळाले असेच महान पुरुष आणि महिला. आज त्यांची एक सभा भरली आहे. सभेत सगळेच स्वातंत्र्य सेनानी, हुतात्मे, क्रांतिकारक, पुढारी नेते, महात्मे, अगदी सगळे, सगळेच लोकं उपस्थित आहेत. प्रत्येक जण आपल्या आठवणींना उजाळा देत आहे. आणि आता वेळ आहे सावरकरांच्या बोलण्याची. सावरकर पुढे येऊन सगळ्यांना नमस्कार करतात आणि सुरुवात करतात.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून आज ७५ वर्षे झाली पण अजूनही ते दिवस विसरु शकत नाही. माझा जन्म झाला नाशिकात भगुर गावी,दिवस होता २८ मे १८८३. शिक्षण घेत असताना ब्रिटिशांचे आपल्या लोकांवर होणारे अत्याचार दिसत होतेच त्यात कानावर आले ते चाफेकर बंधूना झालेल्या फाशीचे वृत्त आणि हीच ती वेळ होती, विनायक क्रांतिकारी होण्याची, मग ठरवले स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा सेतू उभारायचा आणि कुलदेवता भगवती समोर शपथ घेऊन मातृभूमी साठी वाट्टेल ते करायला तयार व्हायचे.

लोकमान्य टिळक तिथे बसले होते त्यांच्या कडे बघून सावरकर बोलले, “आपल्याच पावलावर पाऊल टाकत मी पुढील वाटचाल सुरु केली” ते क्रांतीपर्वच होते. अगदी रक्तरंजित संघर्ष करत ब्रिटिशांना आपल्या देशातून हद्दपार करायचे होते. पण ते इतके सहज नव्हतेच म्हणून “अभिनव भारत” ची स्थापना केली. मला लंडन ला जायला शिवाजी शिष्यवृत्ती मिळाली आणि त्यासाठी लोकमान्य टिळकांनी शिफारस केली ज्यामुळे मी माझी पुढची वाटचाल करु शकलो.

त्या नंतर मला ५० वर्षांच्या जन्मठेपेची, अंदमान मध्ये काळ्या पाण्या ची झालेली शिक्षा, ते साल होते १९११. खूप यातना सहन केल्या खूप त्रास भोगला. शरीरावर उमटलेले ते व्रण याची साक्ष देत होते. पण खचून गेलो नाही कारण डोळ्यासमोर फक्त मातृभूमी दिसत होती आणि तिला दिलेलं वचन पूर्ण करायचं बाकीच होत. हे मीच नव्हे तर तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाने बघितलेले स्वप्न होते. आपले मतभेद असले तरी प्रत्येक जण आपापल्या परीने देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी झटले आणि बलिदान दिले.

पण ज्या  स्वातंत्र्यप्राप्तीसाठी, हातात सत्ता नसताना, कुठल्याही प्रकारचा आर्थिक स्वार्थ नसताना, कुठल्याही प्रकारचा राजकीय पाठिंबा नसताना, परकीयांची सत्ता आपल्यावर असतानाही समाजातील प्रत्येक स्तरातील लोकांनी ज्या यातना सहन केल्या त्या पेक्षा जास्त या देशाच्या सद्य स्थितीकडे पाहून होत आहे. आपल्यापैकी कोणीच अशा देशाची अपेक्षा केली नव्हती. आज प्रत्येक पक्षाने आपापला धर्म आणि स्वातंत्र्य सैनिक वाटून घेतले आहे. आणि त्यावरून राजकारण करीत आहेत. भारत हा संविधानानुसार धर्मनिरपेक्ष देश म्हणून ओळखला जातो. प्रत्येक जातीतील लोकांना संविधानानुसार सवलती दिल्या जातात. पण दुर्दैव इतके की, इथल्या प्रत्येक स्तरात धर्मवाद आणि जातीयवाद अगदी मुळापासून मुरलेला आपल्याला दिसून येतो.

जातीभेद निर्मूलन हे अजूनही झाले नाहीत, आज सुद्धा जाती,धर्म, पंथ यावरून लोकांना त्रास होतोच आहे. कुठे तरी दंगली होतात कुठे तरी हकनाक बळी जातात आहे. जी जात नाही तीच 'जात' आहे. लोक अजूनही भेदाभेद करीत आहेत. लोक राहणीमानात बदल करीत आहे पण विचार मात्र जुन्या काळातीलच आहेत. यासाठीच केला होता का हा अट्टहास? प्रश्न पडतोय.

***आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका ।***

***पितृभू:पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ॥***

या व्याख्येत सांगायचे झाले तर, “हिंदू म्हणजे तो, जो सिंधू नदीपासून हिंद महासागरापर्यंत पसरलेली ही भारतभूमी, आर्यभूमी, पितृभूमी, नि पुण्यभूमी आपली मानतो  व हक्काने तसे सांगू शकतो,  लोकांनी जात म्हणून नाही तर हिंदू म्हणून जगावं अशी शिकवण मी दिली होती.

मला जेव्हा अंदमानातून रत्नागिरीत स्थलांतरित केले. तेव्हा मी जातिभेदाविरोधात  कार्य सुरु केले रत्नागिरीत भागोजीशेठ कीर या दानशूर सद्गृहस्था च्या मदतीने पतितपावन मंदिर उभारले ज्यात सर्व जातीच्या लोकांना प्रवेश होता. देशात विकास महत्त्वाचा असेल तर सामाजिक बंधुता जोपासणे आवश्यक आहे. पण, ती केवळ एका जातीने नव्हे, सर्व जातींनी जोपासणे तितकेच महत्त्वाचे आहे. हा समाज एकत्र व्हावा असे वाटत असेल तर ‘जात’ हे ध्येय न ठेवता ‘अखंड हिंदुस्थान’ हे ध्येय ठेवले पाहिजे.

तसेच आंतरजातीय विवाह  पद्धतीचा आग्रह धरला. ही सामाजिक शिकवण आजच्या घडीलाही लागू पडते. पण आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना आजही काही ठिकाणी स्वीकारले जात नाही. काही ठिकाणी त्यांना  जीवानिशी मारले जाते. माणसाला माणूस म्हणून ओळखा जातीने नाही.

एकविसाव्या शतकात अशा घटना घडणे खूप चिंताजनक बाब आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडे बघून सावरकर बोलले, “आपण पण या विषयी आपले

विचार मांडले होते आणि आंतरजातीय विवाह करणाऱ्या दाम्पत्याला सरकारकडून मदत मिळावी म्हणून आग्रह धरला होता. त्या धर्तीवर आज अशा योजना सरकार राबवत आहेत पण लोकांचे बुरसटलेले विचार रुढी आणि परंपरेला धरूनच आहेत. हीच या देशाची शोकांतिका आहे”

माझी आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यावर अपरिमित श्रद्धा होती. आणि अद्ययावत्ता हा माझा विज्ञान विचारांचा मूलमंत्र होता. हिंदूंनी आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान अवगत करावे व आपला उत्कर्ष साधावा यासाठी मी विज्ञाननिष्ठेचा आवर्जून पुरस्कार व प्रचार त्या वेळेस केला. तर्काच्या कसोटीवर न बसणाऱ्या हिंदू जीवन पद्धतीतील दुष्ट स्वरूपाच्या रुढी परंपरा व प्रथांवर कठोर टीका केल्या. जन्माधिष्ठीत जातीव्यवस्था व स्पृश्यअस्पृश्य यावर मी कठोर आघात केला. कारण त्यावेळी राष्ट्र म्हणून टिकायचे असेल, तर भक्तिभावात बुडून नव्हे, तर विचारशील आणि वैज्ञानिक तत्त्वावर आधारित बदल अपेक्षित होता.

अखेर ब्रिटिशांचे जुलमी शासन संपुष्टात आले आणि आपला भारत देश स्वतंत्र झाला तो दिवस आपल्या सगळ्यांसाठीच सोनेरी दिवस होता. शेवटच्या श्वासापर्यंत त्या मातृभूमीची सेवा करण्याचे भाग्य मला लाभले. आणि अखेर तो दिवस आला,26 फेब्रुवारी, साल होते १९६६ मी पंचतत्वात विलीन झालो. हे बोलून सावरकर थांबले आणि काही वेळ तिथेच स्तब्ध उभे राहिले.

स्वातंत्र्यवीर सावरकर हे क्रांतीकारक होते त्यामुळे त्यांचे विचार हे मीळमीळीत नसणारच. जे राष्ट्रहित विघातक होते त्या त्या गोष्टींवर त्यांनी घणाघाती टीका केल्या. आता वेळ आहे आपण आपल्या देशाला कोणती दिशा देणार . आपल्या स्वातंत्र्य सेनानींनीआपल्या प्राणाचे बलिदान दिले ते केवळ भारत देशाने स्वतंत्र श्वास घ्यावा म्हणून. पण आज घडीला सत्तेच्या लालसेपोटी लोक याच स्वातंत्र्य सेनानींचा राजकारणात वापर करीत आहेत. या साठी त्यांनी आपल्या जीवाची आहुती नव्हतीच दिली. आजच्या पुढारी नेत्यांना अशी आहुती बनणे शक्यच नाही प्रत्येक व्यक्ती स्वार्थी होत आहे. आणि म्हणूनच आपल्याला कोणतेच अधिकार नाही या स्वातंत्र्य सैनिकांचे चरित्र मलिन करण्याचे.

आजच्या तरुणाईने सखोल विचार करणे गरजेचे आहे. कारण उथळ पाण्याला खळखळाट जास्त असतो. कोणी आपले भांडवल करून वापर करू नये यासाठी डोळसपणे विचार करा.

# रंगुनी रंगात साऱ्या

मृण्मयी कतर्णी - सांबरे

स्वातंत्र्यवीर सावरकरांना पाच- सातशे शब्दांत समजून घेणे केवळ अशक्य. ते मुळात एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. चक्रधर स्वामींनी सांगितलेल्या हत्तीच्या दृष्टांताचा दाखला त्यांच्याबाबतही लागू पडतो. सावरकर नेमके कोण होते? ते समाजसुधारक होते का? हो होते. ते द्रष्टे होते का? हो होते. ते हिंदुत्ववादी होते का? तर होते. ते विज्ञाननिष्ठ होते का? तर तेही होते. तसेच ते साहित्यिक , उत्कृष्ट वक्ते , प्रतिभावंत लेखक, महाकवी होते का? तर याचेही उत्तर हो असेच येईल.

सावरकरांचे सर्व लेखन मुख्यतः स्वातंत्र्याची चळवळ, समाजप्रबोधन आणि विचारप्रवर्तन यासाठी केले गेले आहे. तर्कशुद्ध लेखन, बुद्धिवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रीय बाणा आणि त्यागवृत्तीचे दर्शन ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये!

साहित्यिक या नात्याने सावरकरांनी अनेक प्रकार हाताळले. कवी, नाटककार, शाहीर, कादंबरीकार, निबंधकार, पत्रलेखक, चरित्रकार, आत्मचरित्र लेखक, व्याकरणकार, इतिहासकार, पत्रकार अशा विविध भूमिकांतून त्यांनी आपली साहित्यसंपदा सृजन केली, मराठी भाषेत १०००० हून अधिक पाने व इंग्रजीत १५००हून अधिक पाने भरेल इतके लिखाण केले,भाषाशुद्धीची चळवळ केली, मराठी भाषेला अनेक नवे शब्द दिले, मोडी लिपीला प्रोत्साहन दिले,उर्दू भाषेत गझला लिहिल्या. या कामगिरीबद्दल नागपूर व पुणे विद्यापीठानी त्यांचा 'डी.लिट' देऊन सन्मान केला. त्यांनी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही भूषविले.सावरकर हे इतिहास घडविणारे इतिहासकार होते. त्यांचा शिखांचा इतिहास अप्रकाशित राहिला. सावरकरांनी विचारप्रवर्तनाबरोबरच भाषाशुद्धीचे प्रत्यक्ष कार्य केले. क्रमांक, चित्रपट, बोलपट, नेपथ्य, वेशभूषा, दिग्दर्शक, प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शस्त्रसंधी, टपाल, दूरध्वनी, नभोवाणी, ध्वनिक्षेपक, अर्थसंकल्प, विधिमंडळ, परीक्षक, तारण, संचलन, गतिमान नेतृत्व, क्रीडांगण, सेवानिवृत्तिवेतन, महापौर, हुतात्मा, उपस्थित असे शतावधी समर्पक शब्द सावरकरांनी सुचविलेले आहेत.

सावरकर जात्युच्छेदक सुद्धा होते . जात पात, उच्च निचपणा त्यांनी कधीच मानला नाही.अंदमानातून सुटल्यानंतर सावरकरांना ब्रिटिशांनी रत्नागिरीत स्थानबद्ध केले . हिंदू समाज एकजीव आणि संघटित करण्यासाठी सावरकरांनी रत्नागिरीत राहून कार्य केले. हिंदू समाजाच्या अध:पतनाला जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्य जबाबदार आहे, हे सावरकरांनी लक्षात घेऊन त्या विरोधात काम केले. हिंदू धर्मात जातिव्यवस्थेचे, विषमतेचे समर्थन आहे, त्यामुळेच हिंदूसंघटन करण्यासाठी सावरकरांनी लक्षात घेऊन

त्या विरोधात काम केले. हिंदू धर्मात जातिव्यवस्थेचे, विषमतेचे समर्थन आहे, त्यामुळेच हिंदूसंघटन करण्यासाठी सावरकरांनी धर्मचिकित्सेची तलवार उपसली. आपल्या लेखनाने कोणी सनातनी दुखावेल याची चिंता न करता अंधश्रद्धा, जातिभेद यांवर त्यांनी कडाडून टीका केली. स्वकीयांतील जातीयतेवर पण निर्भीड टीका केली. त्यांनी जवळपास ५०० मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली केली. अनेक आंतरजातीय विवाह लावले, सहभोजने आयोजित केली, सर्वांसाठी 'पतित पावन मंदिर' सुरू केले, सामाईक भोजनालयही सुरू केले. जातिभेद तोडण्यासाठी सहभोजनाचा धडाका उडवून दिला. सुमारे १५ आंतरजातीय विवाहही त्यांनी लावून दिले.

सावरकरांनी अतिशय स्पष्ट शब्दात जातिव्यवस्थेवर हल्ला केला. अनुवंशात जातीचे मूळ आहे ह्या मुळावरच सावरकरांनी हल्ला चढवत अनुवंश हा आचरटपणा आहे, जर ब्राह्मणाच्या घरी 'ढ' जन्मला तर त्याला 'ढ'च म्हटले पाहिजे आणि जर शूद्रांत 'ज्ञ' निघाला तर त्याला 'ज्ञ'च म्हटले पाहिजे असे त्याचे स्पष्ट मत होते. सावरकर म्हणतात की 'आज आमच्या हिंदू समाजात पोथीत लिहिले आहे ते सोडून इतर कोणत्याही लक्षणाने सहज विभिन्नत्व विविध जातींमध्ये दिसून येत नाही.

जातिव्यवस्था मोडण्यासाठी त्यांनी ***1) वेदोक्तबंदी 2) व्यवसायबंदी 3) स्पर्शबंदी 4) सिंधूबंदी 5) शुद्धीबंदी 6) रोटीबंदी 7) बेटीबंदी*** ह्या सात बेड्या मोडायला हव्यात हे सांगितले. ते म्हणतात, पोथीजात जातिभेद हा मनाचा रोग आहे. मनाने तो मानला नाही की झटकन बरा होतो.

सावरकर हे विज्ञानवादी सुद्धा होते हे कदाचित अनेकांना पटणार नाही पण आपल्या वागण्यातून बोलण्यातून त्यांनी कायम हे दाखवून दिलं आहे. 'मायासृष्टीत जोवर मनुष्य आहे आणि गाय व बैल हे पशू आहेत, तोवर माणसाने त्याच्याहून सर्व गुणांत हीन असलेल्या पशूस देव मानणे म्हणजे मनुष्यास पशूहून नीच मानण्यासारखे आहे. गाढवाने पाहिजे तर त्याहून श्रेष्ठ पशू असलेल्या गाईस देव मानावे; मनुष्याने तसे मानण्याचा गाढवपणा करू नये. ..कोणतीही गोष्टी धर्म आहे असे पोथीत सांगितले आहे, म्हणूनच तसे डोळे मिटून मानण्याची पोथीनिष्ठ आंधळी भावना आता झपाट्याने मावळत आहे आणि ती मावळत जावी हेच आता मनुष्याच्या प्रगतीस अत्यंत आवश्यक आहे. एक वेळ राष्ट्रात थोडी गोहत्या झाली तरी चालेल, पण उभ्या राष्ट्राची बुद्धिहत्या होता कामा नये. यास्तव गाय वा बैल हे पशू आपल्या कृषिप्रधान देशात मनुष्यहितास

अत्यंत उपकारक आहेत इतकेच सिद्ध करून, व त्या पशूचा उपयोग राष्ट्रास ज्या प्रमाणात, नि ज्या प्रकारे होईल, त्या प्रमाणात नि त्या प्रकारे पशू म्हणूनच जोपासना करू म्हणाल, तरच ते राष्ट्राच्या निर्भेळ हिताचे होईल. पण त्या हेतूने गाय ही देव आहे कारण पोथीत तिची पूजा करणे हा धर्म आहे, इत्यादी थापा माराल, तर त्यावर जरी राष्ट्राने यापुढेही विश्वास ठेवला नि गोरक्षण थोडेसे अधिक झाले, तरीही त्या पोथीजात प्रवृत्तीला उत्तेजन देण्याचे जे अपकार्य त्यायोगे करावे लागते त्याचे परिणाम राष्ट्राची शतपटीने अधिक हानी करील असे त्यांचे ठाम मत होते. त्यांच्या मृत्यू पत्रात त्यांनी असे लिहिले होते की, "माझे प्रेत शक्यतो विद्युतदाहिनीत जाळण्यात यावे. जुन्या पद्धतीप्रमाणे ते शक्यतो माणसांनी खांद्यावरून नेऊ नये, किंवा कोणत्याही प्राण्याच्या गाडीमधून नेऊ नये, तर ते यांत्रिक शववाहिकेतूनच स्मशानात नेले जावे.. माझ्या मृत्यूनिमित्त कोणीही आपली दुकाने किंवा व्यवसाय बंद ठेवू नयेत. कारण त्याने समाजाला फार त्रास होतो. घरोघरीच्या संसारासाठी दैनिक आवश्यकतेच्या वस्तू न मिळाल्याने अडथळा होतो. माझ्या निधनानिमित्त कोणीही सुतक, विटाळ, किंवा ज्यायोगे कुटुंबीयांना किंवा समाजाला निष्कारण त्रास होतो अश्या पिंडदानासारख्या कोणत्याही जुन्या रुढी पाळू नयेत. त्या पिंडांना काकस्पर्श होईतो वाट पाहत बसणे इत्यादी कालबाह्य गोष्टी पाळू नयेत."

सावरकरांचे हिंदू महासभेचे कार्यही अफाट होते  रत्नागिरीत सावरकर सुमारे १३ वर्षे स्थानबद्धतेत होते. , सावरकरांनी  सात वर्षे हिंदू महासभेचे अध्यक्षपद भूषविले. झंझावाती दौरे, मोठ्यामोठ्या सभा, हिंदूंची सैन्यभरती, रॉयल क्लब्सची स्थापना अशा अनेक मार्गांनी त्यांनी हिंदू महासभेचे कार्य केले. त्यांनी आधुनिक विचारधारेप्रमाणे बुद्धिवाद व विज्ञाननिष्ठा यांची कास धरून हिंदू धर्मात सुधारणा करण्यासाठी लढा दिला.

तब्बल ११ वर्षे अंदमान चा छळ सहन करत असतानाही सावरकरांचे सर्जनशील कवित्व आणि बंडखोर क्रांतिकारकत्व तसूभरही कमी झाले नव्हते. बाभळीच्या काट्यांनी त्यांनी तुरुंगाच्या भिंतीवर  कमला हे महाकाव्य लिहिलं.

जयोस्तुते,ने मजसी ने,शत जन्म शोधिताना,स्वतंत्रते भगवती या तुम्ही प्रथम सभेमाजीं। आम्ही गातसों श्रीबाजीचा पोवाडा आजी, हे हिंदुशक्ति संभूत दिप्ततम तेजा,आत्मबल ,प्रियकर हिंदुस्तान,हिंदूंचे एकतागान, जय देव जय देव जय जय

शिवराया अश्या अनेक कविता,पोवाडे,नाट्यगीते ह्याच बरोबर आरती सुध्दा सावरकरांनी रचल्या आहेत.

सुमारे ६० वर्षे त्यांनी स्वातंत्र्य व सुराज्य यांसाठी अथक परिश्रम घेतले. इ.स. १९६६ मध्ये वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांनी प्रायोपवेशनाचा निर्णय घेतला. १ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांनी अन्न, पाणी आणि औषधाचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. अन्नत्याग केल्यानंतर २६ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांचे प्राण पंचतत्त्वात विलीन झाले.

एक क्रांतिकारक, ज्वलंत साहित्यिक, महाकवी, समाजसुधारक, हिंदू संघटक, विज्ञाननिष्ठ, जात्युच्छेदक या पैलूंसह स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारतीय समाज ढवळून काढला, स्वातंत्र्यलढ्यात अभूतपूर्व योगदान दिले. फाळणीला व तत्कालीन काँग्रेसच्या धोरणांना त्यांनी प्रखर विरोध केला. स्वातंत्र्यानंतरही त्यांनी सीमांची सुरक्षा, सैनिकांची संख्या वाढवणे, शस्त्रसज्जता अशा अनेक विषयांचा आग्रह त्यांनी धरला. ८३ वर्षांचे आयुष्य ह्या माणसाने भरभरून जगले. आयुष्याचा असा कुठलाच रंग नसेल ज्यात सावरकर रंगले नाहीत . अगदी संसार सुध्दा त्यांनी उत्तम केला अर्थात् आपल्या सगळ्यांसारखा काऊ चिऊ चा त्यांचा संसार नव्हताच. अखंड भारताला आपला परिवार मानून कुटुंब प्रमुख ह्या नात्याने त्यांनी हा डोलारा समर्थपणे सांभाळला. काळाच्या पडद्याआड गेलेलं हे भारत मातेचं अमोलिक रत्न आजही आपल्याला त्याच्या दूरदर्शी विचारांनी मार्गदर्शन करत राहणार ह्यात शंकाच नाही.

# सावरकर- एक धगधगते अग्निकुंड !

स्नेहा जोशी

"सावरकर नाव घेताचं डोळ्यांसमोर उभं रहातं ते एक जाज्वल्ल्य इतिहासाचे सोनेरी पान! भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी आजन्म फक्त शिक्षेचे भोगी ठरलेल्या सावरकरांनी स्वातंत्र्यसंग्रामाच्या अग्निकुंडात आपल्या आयुष्याच्या समिधा अर्पण केल्या आणि म्हणुनचं सावरकर आणि त्यांचं हिंदुत्व हे आजही आपल्याला दिशादर्शक आहे.

आजच्या काळातही विनायक दामोदर सावरकर या नावानेचं काहींच्या कपाळी आठ्या येतात त्याचं कारण ही हेचं आहे. सावरकरांचे विचार खरंतर कट्टर लोकांनाही न पचण्यासारखेचं आहेत. अखंड भारताचे स्वप्न ज्या डोळ्यांनी पाहिले, त्या डोळ्यांची दुरदृष्टी किती व्यापक होती, हे आजच्या घडीला सहज समजुन येईल. सुधारणावादी सावरकरांनी सामान्य लोकांसाठी केलेले काम अभूतपुर्व असेचं आहे.रत्नागिरीच्या पतितपावन मंदिराची उभारणी करून दलितांचा मंदिर प्रवेश घडवुन आणणे असो किंवा सामान्य घरांतील स्त्रियांचा समाजातील वावर वाढावा, त्यांच्या आचार विचारांची देवाण घेवाण व्हावी, यासाठी सार्वजनिकरित्या हळदीकुंकू समारंभांचं आयोजन करायला सांगणारे सावरकर किती धोरणी होते, हे लक्षात येते.

अगदी दुसरे महायुद्ध सुरू व्हायच्या आसपास किंबहुना आधीचं,"हिंदी महासागरात मला जपानी बुटक्या लोकांच्या सावल्या पडलेल्या दिसत आहेत,"असे सावरकर म्हणत होतेचं.महायुद्धाची वेळ ही भारतीय स्वातंत्र्य मिळवायची उत्तम वेळ आहे, असे ते नेहमी म्हणत असत. त्यानुसार युद्ध सुरू होण्याआधीचं तात्यारावांनी भारतीयांना सैन्यात जा, असा सल्ला दिला होता.

हिंदुंचा अखंड हिंदुस्थान हि सावरकरांची सिंहगर्जना होती, पण जिनांची पाकिस्तानाची योजना क्रमशः साकारत होती. हिंदुस्थानच्या फाळणीला काँग्रेसच्या गोटातुन आणि गांधींच्या अनुयायांकडुन छुपा पाठिंबा मिळु लागला होता. तेव्हा 1942 साली सावरकर म्हणाले होते, "माझ्या हृदयात अखंड भारताचा नकाशा कोरलेला आहे, मी त्यातला कोणता भाग तोडुन देऊ? पेशावर देईन तर त्या भागात पाणिनी (संस्कृत भाषेचा व्याकरणकार) होऊन गेला, द्वारका देईन तर साक्षात श्रीकृष्णाचा अवतार तेथे झाला आहे. बंगालमध्ये काली मातेची, चैतन्याची पुजा होते. महाराष्ट्र म्हणाल तर मी माझे हृदय तोडुन दिल्यासारखे होईल. व्यास, वाल्मिकी, पराशर अशा महान तपस्व्यांनी पावन केलेल्या देशाचे, या हिंदुस्थानाचे तुकडे करण्यास कोणता हाडाचा हिंदु तयार होईल? हा देश म्हणजे आमचे केवळ घर नाही तर पवित्र मंदिर आहे.आमच्या हृदयातील

त्याची प्रतिमा जर दुभंगली तर ती मृत होईल. मला त्याची पुजा करता येणार नाही. ती प्रतिमा मला अखंडचं ठेवली पाहिजे."इतक्या तळमळीने सावरकर सतत अखंड हिंदुराष्ट्रासाठी आग्रही होते.

सावरकरांविषयीचा अजुन आवडीने चघळला जाणारा विषय म्हणजे "माफीपत्रे". ज्या इंग्रजांच्या तावडीतुन सुटण्यासाठी सावरकरांनी प्राणपणाने करता येईल तेवढे प्रयत्न केले, त्या प्रयत्नांपैकीचं ती पत्रे ही होती, जी माफीनामे म्हणुन संबोधिली जातात. ज्या शिक्षेत इंग्रजांनी सावरकरांना साध्या साध्या गोष्टीची सवलत देणं बंद केलं होतं, त्याचं काळात त्यांच्या सोबतच्या कित्येक कैद्यांना सवलती देण्यात आल्या होत्या. भारतमातेच्या स्वातंत्र्यलढ्यात आपलं योगदान असावं आणि त्यासाठी या ना त्या मार्गाने शिक्षेतुन सुटका मिळावी, एवढंच सावरकरांचं धोरण होतं. कारण, बाहेर राहुन जितकं कार्य करता येणार होतं, ते तुरूंगात राहुन कदापिही शक्य होणार नव्हतं, हे सावरकर जाणुन होते.म्हणुन त्यांनी इंग्रज सरकारला शिक्षेतुन सुट मिळावी, मुक्तता मिळावी यासाठी पत्रे लिहिली होती आणि त्यात स्पष्टपणे सावरकरांनी असं लिहिलं होतं, कि जे सरकारविरोधात मी काम केलं आहे, त्याची शिक्षा मी भोगलीये पण इथुन पुढे मी असं कुठलंही काम करणार नाही. स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी होणार नाही. असं लिहिण्याचा केवळ एकचं उद्देश होता, कि इंग्रज कदाचित या पत्रांचा विचार करून आपल्याला सोडतील. हि माफीपत्रे म्हणजे केवळ सुटकेचा मार्ग होता, इंग्रजांचे केलेले लांगुलचालन नाही!

सावरकरांची विचार करण्याची हातोटी ही काळाच्याही पुढची होती. त्यामुळेचं समकालीन सुधारणावाद्यांनीही त्यांच्या विचारांना विरोधचं केला. अखंड भारताचं स्वप्न पाहणार्या सावरकरांचा भारतीय स्वातंत्र्य संग्रामात 'धगधगते अग्निकुंड' असा जो उल्लेख केला आहे, तो अगदीचं योग्य असाचं आहे. शेवटी काय,

***"अनादी मी, अनंत मी, अवध्य मी भला"***

असं म्हणणारे सावरकर आणि त्यांचे विचार खरोखर कालजयी आहेत !!!

# शूरा मी वंदिले

निर्मिती देवलसी

*'देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि आपण त्याचं देणं लागतो'* असं विनायक दामोदर सावरकर नेहमीच सांगतात.

*देशासाठी पंचप्राण तर्पण*

*राष्ट्र यज्ञ सर्वस्वाचे अर्पण*

*त्यांची स्मृती मी पुण्यकारक*

*आत्म्यास मार्ग हुतात्मा स्मरण*

देशाच्या स्वातंत्र्यासाठी , देशाच्या कल्याणासाठी या भारत मातेच्या सुपुत्रांनी आपल्या जीवनाची आहुती दिली. त्यांची आठवण म्हणजे मी. मी आहे. माझा हेवा इंद्रालाही वाटावा असे भाग्य मला लाभले आहे. देशासाठी ज्यांनी बलिदान दिले त्यांना थोडं आठवावं आणि त्यांच्या त्यागाचं स्मरण ठेवावं. देशभक्तीतून धडा घ्यावा. त्यांच्या सावलीत बसावं. राष्ट्र मनभावन यातच आमच्या आयुष्याची कृतार्थता आहे . तुमची उक्ती आणि कृती यातून एकच उक्ती यायला पाहिजे -

*हे राष्ट्र देवतांचे*

*हे राष्ट्र प्रेषितांचे*

*आचंद्रसूर्य नांदो*

*स्वातंत्र्य भारताचे*

आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली . अनेक बदल , अनेक धक्के  हे सगळे या देशाने बघितले आहे, अनुभवले आहे आणि याच ७५ वर्षांच्या अनुभवाने येतो समृद्ध झाला आणि त्याच दिमाखात आजही तो उभा आहे.

पारतंत्र्यातील आपली भारत माता स्वतंत्र करण्यासाठी प्राणांची आहुती देणारे वीर पुरुष , वीर सैनिक ,  वीर जवान काही कमी नाहीत . ही भारत माता पारतंत्र्याच्या श्रृंखलांनी जखडलेली कोणालाही बघवत नव्हती . कोणी आंदोलने तर कोणी प्रत्यक्ष जीवाची बाजी लावली आणि याशिवाय त्यांना चांगलाच शह देण्याचा प्रयत्न जिद्दीने केला आणि अखेरीस ही भारत माता १९४७ ला स्वतंत्र झाली . अजूनही चित्रपट , गीते यांच्या माध्यमातून देशभक्तीचे स्फुरण आपल्याला नक्कीच चढत जातं आणि या भारत मातेसाठी जीवाचे बलिदान करू असे म्हणण्याची आज सुद्धा प्रचिती येते. खरंच

हे ! भारत माते , तेरे लिये  दिल दिया है , जान भी देंगे अशी ग्वाही देतो.असेच भारतावरच निस्सीम प्रेम करणारे , भारतावर निष्ठा असणारे , कवी , लेखक , सैनिक , समाजसुधारक , राजकारणी ,स्वातंत्र्यसैनिक , भाषाशुद्धी व लिपिशुद्धी ह्या चळवळींचे प्रणेते , स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर.

पारतंत्र्यातील भारत स्वातंत्र्याची  आतुरतेने वाट बघत होता . भारतमातेच्या हातातील बेड्या तोडून टाकण्यासाठी  अनेक स्वातंत्र्यवीरांनी सैनिकांनी भारत मातेच्या पोटी जन्म घेतला आणि त्यापैकी एक म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर .तेलाच्या घाणिला जुंपलेले  सावरकर यांचा एक न एक प्रसंग आणि प्रयत्न रोमांचक आहे . काही दिवसातच सावरकरांचा कोवळा मुलगा प्रभाकर यांच्या निधनाची बातमी आली आणि मग ब्रिटिशांनी सावरकरांवर निष्कासनाचा आदेश बजावला की , तुम्हाला परत मातृभूमीला जाता येणार नाही .आणि सावरकरांचे प्रकृती प्रचंड खालावली . एक दिवस ते लंडनपासून जवळच असलेल्या ब्रायटन ला गेले . त्यांचे मित्र निरंजन पाल त्यांच्या सोबत होते , त्यांच्या जवळ बसले होते .आणि त्या समुद्र किनाऱ्यावर जाताच सावरकरांच्या मनात विचार स्पर्शून गेला की , एकाच वेळेस हा समुद्र इथे मला आणि पलीकडे माझ्या मातृभूमीला स्पर्श करतोय पण मला मातृभूमीला जाता येत नाहीये आणि मग सावरकरांच्या अंतकरणातून ते शब्द उमटले-

***'ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला'***

इथेच  सावरकरांचे कवी मन जागे होते . सावरकरांचे मन नाही तर त्यांचे प्राण तळमळत होते,  त्यांचे पंचप्राण तळमळत होते . इतक सावरकरांचं त्यांच्या मातृभूमीवर प्रेम होतं . त्यांची पिंजऱ्यातल्या पोपटा प्रमाणे फसगत झाली होती .

***शुक पंजरि वा हरिण शिरावा पाशी***

***ही फसगत झाली तैसी***

पोपट जसा पिंजऱ्यामध्ये अडकावा , हरीण पावामध्ये शिरावा तसा मी इथे अडकलो आहे , असं सावरकरांना वाटत होतं . सावरकर म्हणतात – समजूनत घालशिल माझी , इथे काय कमी आहे ,इथे स्वातंत्र्य आहे , इथे पैसा आहे तुझ्या देशात काय आहे तर

सावरकर म्हणतात-

***'नभि नक्षत्रे बहुत एक परि प्यारा***

***मज भरतभूमिचा तारा'***

अश्या वीर सावरकरांना कोटी कोटी नमन .

सरतेशेवटी हेच म्हणावेसे वाटते -

***शूरा मी वंदिले ।***

***धारातीर्थी तप जे आचरती ।***

***सेनापति यश याचि बले ॥***

"ती" चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

# सावरकरांचे 'अंदमानपर्व'

सायली देशपांडे

### सावरकरांची शपथ :

'या देशाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून शत्रुला मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी शपथ घेतलेल्या सावरकरांना उपमा स्वातंत्र्यवीर सावरकरांचीच! त्यांच्या अलौकिक व्यक्तित्त्वाचा शोध कसा घेणार? 'अनुपम 'असामान्य' 'अद्वितीय' हे उद्गार वारंवार निघावे असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एकेक अंग होते. अट्टलातला अट्टल अपराधी ज्यामुळे मऊ यावा असे अंदमानच्या यमपुरीतले हाल त्यांनी दहा वर्ष पचवले! तर हिंदुस्थानातल्या बंदिवासाचा आत्महत्येला प्रवृत्त करणारा जाच सुमारे तीन वर्षे भोगला! त्यानंतर प्रभू रामचंद्रांच्या वनवासाप्रमाणे रत्नागिरी जिल्हयातील स्थानबद्धता चौदा वर्ष सहन केली. परक्या शासकांच्या पंजात गवसलेला गरुडा प्रमाणे असलेला हा विनायक, सत्तावीस वर्षांनी सुटला आणि हिंदुस्थानाच्या गगनात उंच भरारी मारू असा हा स्वातंत्र्यक्रांतीचा तेजस्वी सूर्य अंदमानात सुद्धा तळपत राहिला तो एका तलवारीप्रमाणे अंधाऱ्या कोठडीतले हाल भोगून सुध्दा तेथील कैदयांचे जीवन बदलून टाकणे ही अशक्यप्राय गोष्ट सुद्धा त्यांनी शक्य करुन दाखविली. ती केवळ त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रत्येक पैलूने.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर एक अक्षरश शतपैलू व्यक्तिमत्त्व, पण ते आहे. सारे पैलू एका सुरेल सुसंगतीत मण्यांप्रमाणे एकमेकांशी जोडलेले, बांधलेले विस्कळीतपणा नाही. प्रत्येक पैलूत अखंडपणा ताल, तोल बिघडत नाही. व्यक्तिमत्त्वाचा केंद्रबिंदू एखादया अचल ताऱ्यासारखा भक्कम, बळकट, एखादया अभेद्य किल्लल्यासारखा जणू काही नभांगणातले एक लक्षवेधी नक्षत्रच ते. केवळ चमकत राहिले ते आपल्या अभेद्य अशा कर्तृत्त्वाने. अगदी अर्करूपानं सांगायचं तर हा गाभा म्हणजे एका वीरवृत्तीचं सधन रुप आहे. ही मूर्तिमंत युयुत्सुता आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर जन्मजात योद्धा आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये सुद्धा अप्रतिम, वैभवशाली आणि अवर्णनीय, अभंग आत्मविश्वास, असीम बुद्धिमत्ता व प्रभावी कृती यांचा खजिनाचं ईश्वरी योजनेनं म्हणा वा परिस्थितीच्या मागणीनं म्हणा एका अलौकिक व्यक्तीच्या रुपानं जन्म घेत होती. तेव्हा तो योद्धा निर्माण होतो. या गुणसंपदेशिवाय इतिहासाचं उत्तम ज्ञान, निसर्गनियम आणि मनुष्यस्वभावाचं सदा जागृत भान या गोष्टी यशस्वी योद्धाला आवश्यक असतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांचं जीवन महानाटय हे या संमिश्र गुण वैभवाचा एक अवघड अविष्कार आहे. सावरकर एक Self Conscious Hero होते!

आत्मनिष्ठ अभिनय आणि विलक्षण कल्पकता लाभलेल्या सावरकरांनी आपले हे राजेपण फार कौशल्याने नि कलात्मकतेने भोगले! पण हा मनुष्य जेवढा रोमँटिक होता तेवढाच 'रियालिस्ट' होता नि 'रियालिस्ट' 'रोमँटिक' वर परिपुष्ट होता हे वैशिष्टय थक्क करणारे आहे. (स्वातंत्र्यवीर सावरकर एक रहस्य ,द.न. गोखले)

### ***सावरकरांची असामान्यतेची कारणे :***

शरीर धैर्य नि मानस धैर्य यांचा आढळ सहसा एकाच माणसात होत नाही. पण सावरकरांच्या ठिकाणी तो झाला होता. ज्याची युद्धप्रवृत्ती प्रबळ असते आणि त्याची जिज्ञासा प्रवृत्ती सामान्यतः तेवढी प्रबळ नसते पण सावरकरांमध्ये ती तशी होती जो वीर असतो तो तत्वज्ञही असणे फार दुर्मिळ, पण तो दुर्मिळ योग सावरकरांच्या ठिकाणी साधला होता. प्रज्ञावन्त हा प्रतिभासंपन्न असणे कठीण पण सावरकर दोन्ही होते. शिवाय ते एकीकडे रोमँटिक स्वप्नदर्शी होते नि दुसरीकडे रिॲलिस्ट वास्तववादी होते.

### ***इंग्लंड :***

सावरकर ९ जून १९०६ या दिवशी इंग्लंडकडे जाणाऱ्या बोटीत बसले आणि सुमारे १५ दिवसांनी लंडनला पोहोचले. जमिनीवर पाय टेकताच त्यांचा चौफेर, प्रचंड खटाटोप सुरु झाला! लंडनच्या ब्रिटीश म्युझियममध्ये बसून संशोधन करुन हिंदी क्रांतिकारकांची गीता ठरलेले दुसरे ज्वालाग्राही पुस्तक १८५७ चे स्वातंत्र्यसमर' लिहून काढले! गुरुमुखी भाषा शिकून नि शीखांचे अनेक ग्रंथ वाचून, रुग्णशय्येवरच त्यांनी 'शिखांचा इतिहास' हा ग्रंथही लिहिला. पण तो क्रांतीच्या वादळवाऱ्यात कोठे तरी नष्ट झाला. बॉंब बनविण्याची विद्या हस्तगत करुन त्यांनी ती हिंदुस्थानात धाडली. पिस्तुले मिळवूनही भारतात पाठविली.

सावरकर क्रांतिकारक होते, हिंदु संघटनी होते याचा अर्थ त्यांच्या मनाचे दरवाजे बंद होते ते इतरांचे द्वेष्टे होते असा नाही. या महामानवाचे मन नेहमी स्वागतशील नि उघडे होते. प्राप्त परिस्थितीत कर्तव्याचा विवेक करुन आपले कर्तव्य ते निग्रहाने तसेच उत्साहाने पार पाडीत पण मानवांना मानव म्हणून प्रेमाने जवळ करीत.

### ***सावरकरांची देशभक्ती :***

स्वदेशाविषयी भविष्यस्वप्ने पाहण्यात त्यांचा जन्म गेला मात्र त्यांची स्वप्ने बहुधा निखळ वास्तवाच्या सूक्ष्म निरिक्षणावर आधारलेली असत आणि द्रष्ट्याच्या

दृष्टिने बहुधा बघितलेली असत. त्यामुळे ते एकीकडे वास्तववादी वाटत, तर एकीकडे हवनमंत्र उच्चारून राष्ट्रकार्याच्या यज्ञाग्नित मनाचा नि शरीराचा एकेक लचका तोडून टाकीत. त्यांची दृष्टि दूरस्थ, रंगीबेरंगी मनोहर स्वप्नांवर अनेकदा खिळलेली असे आणि त्या स्वप्नांची वर्णने त्यांच्या बहुतेक सर्व हवनमंत्रात उमटत. अंदमानात सहतपस्वी राजबंदी हताश झाले असताना ते त्यांना म्हणाले "भविष्यकालात येथेच तुमचे पुतळे उभारले जातील." आता स्वातंत्र्योत्तर काळात सावरकरांचे ते स्वप्न ही खरे ठरत असून अंदमानात क्रांतिकारकांची स्मारके होत आहेत.

अंदमानासारख्या दाट अंधारात आणि अंधाऱ्या कोठडीत यमपुरीतले हाल सोसत असताना सुद्धा हा विनायक भिंतींचा कागद आणि खिळ्याची लेखणी करून काव्य लिहायचा आणि या लेखनातूनच 'कमला' या अप्रतिम काव्याचा जन्म झाला. ही सावरकरांची खरी रोमँटिझम ची कल्पकता होती आणि हा मनुष्य वास्तववादी असून ही रोमँटिक होता याचे हे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ उदाहरण होय.

### *अंदमानपर्व:*

विलायतेत पकडलेल्या सावरकरांना हिंदुस्थानात प्रथम नाशिकला, सरकारवाडयात ठेवण्यात आले होते. तेथे त्यांची कुटुंबीयांशी पहिली भेट झाली. भेटीची परवानगी त्यांचे श्वशूर भाऊसाहेब चिपळूणकर यांनी निर्भयपणे मिळविली होती. आणि त्यांची पत्नी नि मेहणे ही दोघे जव्हारहून दोन घोडयांवर स्वार होऊन नाशिकला आली होती.

त्यावेळी पोलिसांनी एवढी दहशत उत्पन्न केली होती की, सावरकरांच्या कोणाही नातेवाईकाला नाशकातले कोणतेही घर रात्रीपुरते राहायलासुध्दा मोकळे नव्हते. मनुष्यवधात अंग असलेला, काळया पाण्याची शिक्षा झालेला एक भयंकर गुन्हेगार म्हणून हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयापुढे यानंतर सावरकरांचे नाव आले होते तिचा दुसरा हात एका धिप्पाड इंग्रजी अधिकाऱ्याच्या सामर्थ्यसंपन्न ब्रिटीशी सत्तेविरुध्द जाण्याची त्या न्यायालयाची किंवा फ्रेंच सरकारची विशेष छाती नव्हती. त्यामुळे न्यायालयाचा जो निर्णय २४ फेब्रुवारी १९११ रोजी लागला तो अर्धवट लागला! त्यात सावरकरांना फ्रेंच भूमीवर ब्रिटीश अंगरक्षकांनी जी अटक केली ती नियम बाहय होती हे म्हटले होते पण त्यांना घरात फ्रेंचांच्या ताब्यात दिलेच पाहिजे असे सांगणारा नियम नाही, असेही म्हटले होते.

या अर्धवट निर्णयामुळे हेगसंबंधीचा सावरकरांचा शेवटचा आशातंतू तुटला आणि ते ब्रिटीशांच्या पंजात पक्के सापडले. अंदमान हे द्वीप कलकत्त्यापासून सुमारे ६०० मैलांवर आहे. उत्तर अंदमान ५१ मैल लांब, मध्य अंदमान ५९ मैल लांब, दक्षिण अंदमान ४९ मैल लांब आणि लक्षद्वीप ११ मैल लांब आहे. हया पुंजास मोठे अंदमान म्हणतात ह्या बेटाची अजूनपर्यंत म्हणण्यासारखी वसाहत आलेली नसल्याने निबिड आणि ज्यांतील भूमीस खरोखरच सूर्यकिरणांचा स्पर्श सहसा होत नाही. अशी दाट अरण्ये जिकडेतिकडे लागून गेलेली आहेत. हया बेटांतील पहाडात सर्वांपेक्षा उंच पहाड संडल माउंट नावाचे शिखर अजून त्याची उंची तीन हजार फूट आहे.

मोठ्या नद्या मुळीच नसून ठिकठिकाणी पहाडावरून वाहणारे लहान ओढे मात्र बरेच आहेत. ठाण्याच्या तुरूंगानंतर सावरकरांचे अंदमान प्रस्थान सुरू झाले. हया प्रस्थानात अनेक कठीण समस्यांना तोंड दयावे लागले. जहाजात बसल्यानंतर रात्री सुमारे वाजेपर्यंत सावरकरांच्या डोळ्यांस डोळा नव्हता. इतर कैदयांचा दंगा, हसणे, खिदळणे सुरूच होते. शिपायाने शेवटी सांगितल्यामुळे त्यांचा दंगा कमी होऊन रात्री १२.३० च्या सुमारास त्यांच्या डोळ्यास डोळा लागला. सावरकरांचे वडील बंधु बाबाराव सावरकर हे सुद्धा जन्मठेपीवर गेले होते. यांस जन्मठेप ८ जून १९०९ ला झाली. त्यांना कुठे ठेवण्यात आले होते असे शिपायाला विचारल्यावर तो सांगू शकला नाही कारण तो त्या ठिकाणी नुकताच रुजू झाला होता.

काळया पाण्याला जाण्यासाठी इतर कैद्यांसारखे एकाच डब्यात नाही तर स्वतंत्र डब्यात कोंबले गेले. पायात बेडी आणि हातात हातकडी अशी त्यांची अवस्था होती. एकाच हातात नव्हे. तर दोन्ही हातात हातकडी धोतर खेचणे, लघवीस जाणे, शौचास जाणे या कामांना सुद्धा त्या अधिकाऱ्यास हातात हात खिळले असल्याने बरोबरच चलावे लागे. अनेक वेळा प्रवासातून या ओंगळवाण्या प्रकाराला सामारे जावे लागले कोणी सावरकरांना पाहायला आले असता त्यांना हाकलण्यात येई. आणि त्यांच्या डब्यातील प्रत्येक खिडक्या बंद असत. अशा या कठीण परिस्थितीतून दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता अंदमान लागेल अशी कुजबुज सुरु झाली. समुद्र शांत होता एखादया सरोवरासारखा शांत होता आणि यावरून आगबोट सलील विहारत जात होती. सूर्य पृथ्वीकडे एकटक पाहून निरिक्षण करीत होता. अंदमानच्या प्रत्येक कोठडीत मलेरियाचा फार प्रार्दुभाव होता. जळवा वा सापसुरव्या हा भयानक प्रकार सुद्धा तेथील जंगलात म्हणा वा कोठडीत होता.

जारवा ही आदिवासी जमात नरमासभक्षक होती. मनुष्यास ते आपला नैसर्गिक शत्रु समजत असत. पोर्ट ब्लेअर हे वसाहतीच्या मुख्य बंदराचे आणि द्वीपाचे नाव आहे. वीर सावरकर हे अखेरीस ४ जुलै १९११ ला अंदमानला पोहोचले. पूर्वेकडील अंदमान निकोबार द्विपपुंज म्हणजे हिंदुस्थानाच्या पूर्वसमुद्राची द्वारेच होती.

सावरकरांना सात नंबरच्या कोठीत बंद करण्यात झाले आणि तेथूनच आयुष्याची उलटी चक्रे फिरण्यास सुरुवात झाली. सकाळी उठावे सूर्यनमस्कार घालावे. ठरलेली क्रियाकर्मे करावीत आणि पडून राहावे त्या निर्मनुष्य, निःशब्द, अंधाऱ्या कोठडीत तसे म्हटले तर अंदमानासारख्या घनघोर जागेवर सूर्यकिरणे पोहचत नसत परंतु ज्या वेळी सावरकर तिथे राहिले तेव्हा हळूहळू सूर्याचे एक एक किरण येवून या हुतात्म्याचे दर्शन घेऊन धन्य झाले. त्या कोठडीत बसून अनन्य देशभक्तीचे दर्शन सावरकरांनी दिले. 'सागरास' 'सांत्वन' 'माझे मृत्युपत्र' 'आत्मबल' 'पहिला हप्ता' 'सायंघटा' 'मूर्ति दुजि ती' 'मरणोन्मुख शय्येवर' इ कविता त्यांनी कोठडीत बसून लिहिल्या अशा या कठिण, दुर्दम्य, असामान्य परिस्थितीत त्यांनी ५० वर्षे काढली. भारताच्या इतिहासात घडलेला हा एक विक्रमच आहे. असे दिवस घालवता घालवता, जन्मठेपेची शेवटची रात्र येऊन ठेवला. त्या रात्री भयंकर थंडी पडलेली होती. जानेवारी महिना असूनसुद्धा पावसाची जोरदार सर झाली होती. त्यांची पांघरूणे त्यांनाच पुरत नसत. सकाळी नेहमीप्रमाणे कार्यक्रम चालला. तोच कार्यालयातून पर्यवेक्षकांचे बोलवणे आले त्याचबरोबर तेथील कोण्या विश्वासू अधिकाऱ्यांचा संदेशाही झाला की 'सावरकर तुम्ही सुटलांत' म्हणजेच बारा वर्षे ही शिक्षा सावरकरांनी भोगली. आणि जन्मठेपेच्या शिक्षेतून सुटका दिनांक ६ जानेवारी १९२४ रोजी झाली. पुढच्या आयुष्यात त्यांना १९३४ मध्ये १५ दिवस १९४१ मध्ये दोन दिवस १९४८ मध्ये १ नि १९५० मध्ये १०० दिवस बंदिवास घडला. आणि पुढे आपल्या भारतमातेला परकियांच्या बेडीतून मुक्त होताना देखील सावरकरांनी पाहिले.

३ फेब्रुवारी १९६६ या दिवशी त्यांनी प्रायोपवेशनास प्रारंभ केला. अन्न वर्ज्य केले. चहात डाक्टर जीवनसत्वे मिसळू लागले म्हणून त्यांनी चहाही घेतला नाही. पुढे पाणी कमी केले. त्यांच्या पायांवर सूज आली. पायात पेटके उठू लागले. लाडक्या लेकीने आणि इतर आप्तमित्रांनी प्रायोपवेशनास विरोध करण्याचा प्रेमळ आग्रह केला. पण त्यांचा निश्चय अढळ राहिला. त्यांना ताप आला. भोवळ येऊ लागली. पुढे पाणी घेणेहीत्यांना कठीण जाऊ लागले. नाडी मंदावली, मिनिटाला ५० झाली. तोंडाच्या

उजवीकडे क्लेशकारक सूज आली होती. २६ फेब्रुवारीला त्यांची प्रकृती फारच चिंताजनक झाली. रक्तदाब इतका झाला की नोंदताच येत नव्हता वयाच्या ८३ व्या वर्षी त्या दिवशी सकाळी ११.१० ला त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

वैश्विक उर्जेच्या असीम यज्ञकुंडात सावरकरांच्या जीवनाची समिधा विलय पावली! या हवनाचा शेवटचा आहे. असे दिवस घालवता, घालवता जन्मठेपेची मंत्र होता.

***'धन्योऽहम् धन्योऽहम् कर्तव्यं मे न विद्यते किंचित ।***

***धन्योऽहम् धन्योऽहम् प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम् ॥***

***सिंहावलोकन:***

भूईवर सरपटून जर सावरकरांकडे पाहिले तर त्यांच्या यशाचे महत्त्वाचे क्षितीज आपल्या डोळ्यांच्या कडांएवढे लहान दिसेल. पण जर स्वतः ची भूमिका उदार नि उंच करीत वर गेले तर ते क्षितिज मोठे मोठे होत गेलेले दिसेल. त्यांच्या यशाचे नि महत्त्वाचे मापन करण्यासाठी म्हणूनच आपण त्यांचे कार्य बघितले. त्या सर्व कार्यामागची देशभक्ती पाहिली, त्यांच्या ध्येयाची गुणवत्ता मापली त्यांचा गुणासमुच्चय न्याहाळला आणि त्यांच्या आत्मिक समाधानाचीही पाहणी केली तर त्या सर्वांचे गुणमापन करणे ही नक्कीच अशक्यप्राय गोष्ट आहे. परंतु या सिंहाचे जे व्यक्तिमत्त्व होते किंवा जी निश्चय क्षमता होती, सहनशक्ती होती, कल्पकता होती, काव्यप्रवणता होती या सर्व गोष्टी प्रज्ञा आणि प्रतिभा या दोन गुणांनीच साध्य होतात. हे व्यक्तिमत्त्व म्हणजे एक साक्षात्कारिक व्यक्तिमत्त्व होते असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. सावरकर म्हणतात की -

***ने मजसी ने परत मातृभूमिला।***

***सागरा प्राण तळमळला***

***त्वत्स्वामित्वा सांप्रत जी मिरविते ।***

***भिउनी का आंग्लभूमिते***

***मन्मातेला अबल म्हणूनि फसविशी।***

***मज विवासनाते देशी***

*तरि आंग्लभूमि भयभीता । रे*

*अबला न माझिही माता । रे*

*कथिल हे अगस्तिस आता । रे*

*जो आचमनी एकक्षणी तुज प्याला।*

*सागरा प्राण तळमळला । सागरा सागरा.....*

अशा या अलौकिक व्यक्तिमत्त्वाला माझा कोटी कोटे कला प्रणाम..... जय हिंद

शेवटी एवढेच सांगते -

*नेत्रसुख मिळावे व्यक्तिमत्त्व पाहूनी।*
*जणू अंधकार सरावा भास्करा बघूनी ॥*
*असेच अमृत भासे हे वाचूनी।*
*एकदा तरी 'सावरकर' वाचावे जीवनी ॥*

"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

# तात्याराव: एक प्रेरणादायी विचार

प्रांजली पारगावकर

विनायक दामोदर सावरकर या व्यक्तीबद्दल लिहिण्याचा विचार केला तेव्हा असे जाणवले की प्रत्यक्ष सूर्याला गवसणी घालण्यासारखे आहे. प्रखर तेजोनिधी म्हणजे सावरकर काळाच्या खूप पुढे त्यांचे विचार होते. आजपासून दहा वर्षांनी समाजरचना कशी असेल याचं चिंतन त्यांनी केलं होतं आणि ते तसेच आहे हे नंतर दिसून आले बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला जायचा आधीपासूनच त्यांच्या घरात स्वातंत्र्य चळवळीची हालचाल सुरू होती ,त्यांचे मोठे बंधू बाबाराव सावरकर हे स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होते. फर्ग्युसन कॉलेज येथे शिक्षण पूर्ण केल्यानंतर जेव्हा तात्याराव इंग्लंडला गेले तेव्हा त्यांचे लग्न झाले होते तेव्हा त्यांना प्रभाकर नावाचा दीड वर्षांचा मुलगा होता.

इंग्लंडमध्ये राहून फक्त शिक्षण हाच हेतू न ठेवता तिथून देखील स्वातंत्र्यचळवळीत सहभाग ते घेत होते म्हणूनच त्यांना इंग्लंडहून फ्रान्सला जावे लागले. फ्रान्समधून भारतात परत येताना पोलिसांनी त्यांना पोलिसांनी अटक केली पण ते समुद्रातून पोहत भारतात पोहोचण्याचा प्रयत्न त्यांनी केला दुर्दम्य इच्छाशक्ती शिवाय हे शक्य नव्हते. भारतात आल्यावर त्यांच्यावर खटला चालवून अंदमान-निकोबार येथे काळ्यापाण्याची शिक्षा सुनावली पन्नास वर्ष तुरुंगात राहणे या विचारानेच खरेतर एखादी व्यक्ती खचून जाईल तुटून जाईल पण ते सामान्य नव्हतेच, स्वातंत्र्याच्या विचाराने भारलेले आणि त्यासाठी वाट्टेल ते कष्ट दुःख सहन करण्याची त्यांची तयारी होती. अंदमानला काळ्यापाण्याची शिक्षा भोगत असताना त्यांच्यावर ***अनन्वित*** छळ करण्यात येत होते .

तात्यारावांबरोबर काळ्यापाण्याच्या शिक्षेला त्यांचे मोठे बंधू देखील होते, पुन्हा स्वातंत्र्यलढ्यात प्रत्यक्ष भाग घेणार नाही या अटीवर त्यांची सुटका इंग्रजांनी केली परंतु खरे कारण वेगळेच होते त्यांची ***तब्येत बिघडत होती***. अंदमानला खालावत होती तात्याराव किंवा बाबाराव यांच्या तब्येतीची अंदमानला काही बरेवाईट झाले असते तर सावरकर प्रेमींनी भारतात गदारोळ माजवला असतात त्यामुळे त्यांची सुटका झाली. सावरकर हे मानवतावादी होते जातीयवाद त्यांना मान्य नव्हता रत्नागिरीला पतितपावन रामाचे मंदिर त्यांनी बांधले मंदिरात प्राणप्रतिष्ठा हरीजनाच्या हस्ते झाली होती. सावरकरांबद्दल अनेक गैरसमज देखील आहेत परंतु त्यांचे हे इतके स्वच्छ विचार बघतात हे गैरसमज कधीच गळून पडतात. भारताचे संविधान हे लोकशाहीवर आधारित आहे १९४३ ते १९४९ या काळावर या काळात समिती सविस्तर चर्चा होऊन घटना

लिहिली गेली परंतु १९४४ पासून सावरकरांनी राज्यघटना कशी असावी याविषयी अनेक ठिकाणी आपली मतं मांडली. सावरकर हे मानवतावादी ,बुद्धिनिष्ठ तसेच विज्ञाननिष्ठ होते अखंड हिंदुस्थान हे सावरकरांचे स्वप्न होते. समानता आणि समानतेचे विचार त्यांच्या मनातून लेखातून झळकत होते. अवनी ही आमची मातृभूमी आहे ,समस्त मानव जात आमचे राष्ट्र आहे अशी त्यांची भावना होती.

समान अधिकार समान कर्तव्य यांच्यावर आधारित असलेले मानवी संस्कार हेच आमचे अंतिम साध्य असले पाहिजे, असे त्यांचे मत होते. अस्पृश्यता ,जातिभेद आणि वर्णव्यवस्था यांच्याविरुद्ध निरंतर धर्म, अधर्म करण्याच्या सावरकरांना घटनेतील तरतुदी मुळे आनंद झाला होता .त्यांचे स्वागत त्यांनी जन्मजात अस्पृश्यतेचे उच्चाटन या लेखाद्वारे केले होते .सावरकरांनी सुचवल्याप्रमाणे राष्ट्रध्वज यामध्ये अशोक चक्र आले सावरकरांचे भाषेविषयी प्रेम आणि भाषेवरील वर्चस्व त्यांच्या लिखाणातून जाणवते .मराठीला अनेक शब्द त्यांनी दिले हिंदी ही आपली राष्ट्रभाषा असावी असे त्यांचे मत होते. भारतीय राज्यघटना नावा नुसार भारतीयांची राष्ट्रभाषा हिंदी आहेत नागरी लिपीत आहे बिलासपुर येथील १९४४ मध्ये झालेल्या अधिवेशनात ते म्हणाले होते ,राज्यघटनेत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असा कोणताही नियम नको त्यामुळे मानवाच्या स्वातंत्र्यावर परिणाम होईल, प्रत्येक व्यक्तीला त्याच्या धर्मानुसार वागण्याची मोकळीक हवी संस्कृती जपण्याच्या नियमांच्या अडथळा नको, मातृभाषेमध्ये प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या समुदायात बोलण्याची मुभा असावी, भारतीय घटनेत या सगळ्याचा उल्लेख केलेला आहे ,उत्कृष्ट न्यायव्यवस्था हे लोकशाहीसाठी आवश्यक आहे असे तात्यारावांच्या विचार होते .सावरकरांच्या विचारांचे अनेकविध पैलू आहे, जे कितीही अभ्यास असले तरी काही शिल्लकच राहते तूर्तास या लेखात इतकेच धन्यवाद!



देशाच्या सीमा चरख्याच्या सुताने नव्हे तर
तलवारीच्या टोकाने आखायच्या असतात...

- वि. दा. सावरकर